# निम्मी माझी निम्मी तुझी

मुरलीधर जावडेकर



मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे

मुरलीधर जावडेकर

# निम्मी माझी... निम्मी तुझी
# आणि
# इतर एकांकिका

मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे

e distribution by
e Sahity Pratishthan

© सर्व हक्क
**मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे**
(क्र. ई. ५६४८ पुणे दिनांक २१.१.२०११)
यांच्या स्वाधीन

लेखक
**डॉ. मुरलीधर जावडेकर**
महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ
उच्च उत्पन्न गट वसाहत,
इमारत क्र.१, गाळा क्र.९,
संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे ४११०१८.
दूरध्वनी : ०२०-२७४२१६८३
मोबाईल : ९८९०१६९१५६

**प्रथमावृत्ती** : : २०१२

**मुखपृष्ठ**
लक्ष्मीकांत तोष्णीवाल
९४२२३०७४५३

**अक्षरजुळणी**
व्यंकटेश टाईप
सुजाता तोष्णीवाल, पुणे
९४२०४८०५३६

**मुद्रक**
लकी प्रेस, पुणे ३०

**देणगी मूल्य ₹८०=००**

सूचना : या एकांकिकांतील सर्व कथा, सर्व पात्रे, सर्व प्रसंग सर्वस्वी काल्पनिक असून कोणास कोठे वास्तवात साम्य वाटल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

e distribution by
e Sahity Pratishthan

# ई साहित्य प्रतिष्ठान

एके काळी मुंबई-पुणेसारख्या शहरांत एकवटलेला मराठी वाचकवर्ग आता जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकवर्गात जसा ओमान, नॉर्वे, कझाखस्थानचा मराठी वाचक आहे तसा महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यांतलाही वाचक आहे. मराठी पुस्तकांचं वितरण सर्वत्र शक्य होत नाही. पण स्मार्ट मोबाईल मात्र आता घरोघर पोचले आहेत. आणि त्यावर ई साहित्य प्रतिष्ठानची ई पुस्तकं वाचता येतात. वॉट्स ॲप आणि ब्ल्यु टूथ द्वारे ही पुस्तकं एकमेकांना फ़ुकट आणि सहज देता येतात. त्यामुळे अशा वाचकांची फ़ार मोठी सोय होत आहे. ई साहित्य प्रतिष्ठानची ईज्ञानेश्वरी आणि मोरया सारखी पुस्तकं दशलक्षावधी वाचकांपर्यंत पोहोचली. याचं कारण या माध्यमाची सहजता. ई माध्यमातून दर्जेदार सकस वाचनीय साहित्य नव्या पिढीला उपलब्ध करून देण्याचा एक महायज्ञच आम्ही उभारला आहे. आणि त्याला आपली साथ मिळाली तर यातून काही भव्य उभे राहील.

ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े नव्या तरूण वाचकांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न आहे हे खरेच. पण त्याला ज्येष्ठ लेखकांची जोड मिळाली तर त्यातून या चळवळीचा फ़ायदाच आहे. डॉ. मुरलीधर जावडेकरांचे उदाहरण घेऊन जर इतर साहित्यिकांनी आपली ग्रंथसंपदा ई प्रसारणासाठी विनामूल्य उपलब्ध करून दिली तर त्यातून मराठी साहित्याचा फ़ायदाच होईल. सर्व प्रथितयश लेखक कवींना आम्ही हे आवाहन करतो की त्यांनी या नवीन माध्यमाच्या विस्ताराचा विचार करावा. मुख्य म्हणजे ई पुस्तक हे “नैनं छिंदन्ति शस्त्राणि नैनं दहती पावकः” असे अविनाशी असल्यामुळे आपल्यानंतरच्या पन्नास पिढ्यांपर्यंत ते सुखरूप असणार याचाही विचार करावा. याच्या निर्मितीचा अत्यल्प खर्च आणि पर्यावरणाची हानी न होता त्याचा प्रसार हा व्यापक विचारही मनात धरावा. आणि या चळवळीला पाठिंबा म्हणून आपली पुस्तकं वाचकांसाठी उपलब्ध करून द्यावीत.

हे व्यासपीठ तरूण नवलेखकांसाठी तर स्वतःचेच मुक्तद्वार आहेच आहे. आपल्या लिखाणात कितपत दम आहे याचा लेखाजोखा घेण्यासाठी याहून अधिक चांगले माध्यम नाही. कारण वाचकांच्या स्पष्ट प्रतिक्रिया इंटरनेटवर जशा मिळतात तशा आणि त्या संख्येने समोरासमोर मिळण्याची शक्यता कमीच. नवीन लेखकांनी स्वतःच्या करियरची सुरुवात ई पुस्तकांतूनच करावी.

वाचकांनीही आपली जबाबदारीचा वाटा उचलावा. आपल्या ओळखीच्या आठ वाचकांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवावे. त्यायोगे हा वृक्ष बहरत जाईल. आज पावणेदोन लाखांच्या घरात असलेला ई साहित्य प्रतिष्ठानचा वाचकवर्ग लवकरच दहा ते बारा लाखांपर्यंत पोहोचावा हे उद्दिष्ट आहे. बारा लाख म्हणजे फ़ार नाही. बारा कोटी मराठी माणसाचा फ़क्त एक टक्का. तेवढा तरी आपण कव्हर करू या. तेवढे तरी वाचक आपण जमा करू या. त्यांना नवीन आणि जुन्या चांगल्या लेखकांचे भारी भारी साहित्य देऊ या. वाचन संस्कृतीला मोबाईलच्या स्मार्ट युगात नेऊया.

ई साहित्य प्रतिष्ठानचं तिनशेवं पुस्तक लवकरच येत आहे. चार साडेचार वर्षांत तिनशे पुस्तकं. पावणेदोन लाख वाचक. साताठ लाख वेबसाईट व्हिजिट्स. बारा लाखांचं उद्दिष्ट.

कोण म्हणतो मराठी भाषेचं काही खरं नाही?

# esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान

फ़ोन : 9869674820

esahity@gmail.com

पत्ता : जी ११०२, इटर्निटी

तीन हात नाका , ठाणे, ४००६०४

Websites

[www.esahity.com](www.esahity.com)

[www.ednyaneshwari.com](www.ednyaneshwari.com)

[http://etyarth.blogspot.in/](http://etyarth.blogspot.in/)

[http://esahityapratishthan.blogspot.in/](http://esahityapratishthan.blogspot.in/)

[www.marathiriyasat.com](www.marathiriyasat.com)

# अ नु क्र म


| | | | |
|---|---|---|---|
| १. | कर्ण आणि कृष्ण | .......... | ०५ |
| २. | निम्मी माझी... निम्मी तुझी | .......... | ११ |
| ३. | विमानात लोकशाही | .......... | १८ |
| ४. | वेड्यांच्या इस्पितळात लोकशाही | .......... | २३ |
| ५. | महाभारतात लोकशाही | .......... | २९ |
| ६. | बुडत्या बोटीवर | .......... | ३५ |
| ७. | अपघात | .......... | ५६ |



प्रथम प्रकाशन संपादकांच्या सौजन्याने पुनर्मुद्रण.
१. बुडत्या बोटीवर – 'चैत्राली' दीपावली १९७९
२. अपघात – 'कोकणदीप' दिवाळी अंक १९६८

# कर्ण आणि कृष्ण

**कर्ण** : या अखिल विश्वात माझ्याइतका दुर्दैवी जीव दुसरा कोणी असेल का? ब्रह्मांड हलविण्याची क्षमता असलेला मी आज मनानं शतखंड होऊन गेलो आहे! पांडव माझे भाऊ? माझे शत्रू माझे धाकटे सहोदर? धाकट्या भावांना मारण्याचा पराक्रम मी आमच्या जन्मदात्या आईला दाखवायचा? छे! छे! छे! पराक्रमाची शर्थ केवळ पराक्रमासाठीच करावयाची! व्यर्थ, व्यर्थ, व्यर्थ आहे सारं! डोंगरात मारलेल्या आरोळीलासुद्धा प्रतिध्वनी येतो. माझ्या जीवानं फोडलेल्या या किंकाळीला कोणी साद देईल का? ...कर्णाच्या सांत्वनाला कर्णच पाहिजे, कर्णा... कर्णा...

**कृष्ण** : (आतून) कर्णा, कर्णाऽ, मी येऊ का?

**कर्ण** : कोण? माझी साद? माझा प्रतिध्वनी?

**कृष्ण** : (येत) होय, कर्णा. तुझाच प्रतिध्वनी.

**कर्ण** : का येणं केलंत, यादवराज? या वेळी?

**कृष्ण** : अंगराज, तुला अंगांगानं भेटण्यासाठी.

**कर्ण** : युद्धात भिडलेलो आहोतच आपण.

**कृष्ण** : म्हणूनच आता भेटायला आलो. मला एकच क्षण हवा आहे, कर्णा.

**कर्ण** : कृष्णा, आत्ताच माता कुंती येऊन गेली आणि आता तू येतो आहेस? अरे, हे मांडलं आहेत तरी काय? काय हवंय तुम्हांला? युद्धाचं दान स्वीकारण्याचं एकदा मान्य केल्यावर उगीच कितीदा हे धक्के देणार?

**कृष्ण** : कर्णा, मी कृष्ण. पण आज सर्व कृष्णपणा विसरून तुझ्याकडे कर्ण व्हायला आलो आहे.

**कर्ण** : कर्ण एकच आहे, कृष्णा. पांडव पाच राहतील. तसं आश्वासन मी कुंती मातेला दिलं आहे. पण कर्ण एकच आहे. अरे एकटाच आहे. एकाकीपण आहे. माझा जीव घ्यायला तुम्ही सारे उभे राहिलात! अवश्य घ्या. पण माझं हे एकमेवाद्वितीयपणसुद्धा तुम्ही काढून घेणार?

**कृष्ण** : कुणीही एकमेवाद्वितीय नाही, कर्णा. तूही नाहीस. मीही नाही.

**कर्ण** : शक्य नाही. शक्य नाही. अरे, या निराधार जीवनातला माझा एकमेव

आधार – माझा कर्णपणा! मी या कर्णपणातच रंगलो! माझा मीच! मला मीच! मला मी सापडलो आणि माझ्याबरोबर मी गेलो. कर्ण एकच आहे, कृष्णा. अवकाशाच्या पोकळीत एकच नाद घुमतो आहे. कर्ण, कर्ण, कर्ण (मोठ्यानं हसतो.) कृष्णा, तुझा यादवसंभार मोठा आहे, तुझा मित्रपरिवार मोठा आहे, तुझा संसार मोठा आहे. तुझ्या प्रतिमा जिकडे तिकडे उभ्या आहेत. तू असंख्य आहेस, कृष्णा! पण कर्ण मात्र एकच आहे! एकच! एकमेवाद्वितीयच! (हसतो.)

**कृष्ण** : कर्णा, जरा बघ, हा कर्णच आहे.

**कर्ण** : (अनावर होऊन) कृष्णा, हाही वाद उद्याच्या युद्धात सुटेलच की! युद्ध स्वीकारलं आहे ना आपण? युद्ध हेच जीवन. जीवन हे जीवन नव्हे! युद्ध हेच जीवन! कृष्णा, युद्धाला सिद्ध हो. मीही सिद्ध होतो.

**कृष्ण** : सर्वांत मोठी लढाई खेळायची आहे, कर्णा, तुला आणि मला.

**कर्ण** : कोणती?

**कृष्ण** : स्वतःलाच जिंकण्याची. कर्णा, स्वतःच्या मनाला जिंकून घे, आणि ओळख.

**कर्ण** : कृष्णा, तू तत्त्वज्ञानी आहेस. तू अर्जुनाला गीता सांगितलीस. पण कृष्णा, कुठल्याही तत्त्वज्ञानानं माझ्या मनाची आग शांत व्हायची नाही रे नाही.

**कृष्ण** : कर्णा, खरं आहे. तत्त्वज्ञानानं बुद्धी शांत होईल पण मनाची आग शांत व्हायची नाही. म्हणूनच कर्णा, अर्जुनाला मी गीता सांगितली पण तुला भेटायला स्वतः आलो.

**कर्ण** : काय आता भेटून उपयोग आहे? अरे, ही युद्धाची आग विझवायची नाही, असंच आपण ठरवलं आहे; आणि ही भडकलेली आग सर्वस्वाचा स्वाहा करून जेव्हा आपोआप विझेल तेव्हाच विझणार आहे! कोणास ठाऊक ते पाहायला कोण असेल!

**कृष्ण** : म्हणूनच आता भेटू या. उद्या कदाचित तू नसशील. कदाचित मीही नसेन.

**कर्ण** : कृष्णा, कोण भेटतात? तू कुठे अन् मी कुठे? तू राजा, मी सामान्य कुळातला.

**कृष्ण** : कर्णा, मीही सामान्य कुळातला म्हणूनच वाढलो आहे.

**कर्ण** : राजा म्हणून जन्म घेऊन मी सूतपुत्र म्हणून जगलो!

**कृष्ण** : मीही गवळी म्हणूनच नाही का वाढलो?

**कर्ण** : सूर्यपुत्र असूनसुद्धा जन्मतःच मी सूतपुत्र म्हणून सामाजिक रूढीच्या बेडीत अडकून पडलो!

**कृष्ण** : कर्णा, मीही बंदिवासातच जन्माला नाही का आलो? अरे, आपण नियतीचेच बंदी...

**कर्ण** : कृष्णा, माझ्यासारख्या सुंदर मुलाचा माझ्या आईनं जन्मतःच त्याग केला!

**कृष्ण** : कर्णा, माझ्याही आईनं माझाही त्यागच केला. कर्णा, शांत हो, लक्षात घे, दोघींचाही इलाज नव्हता.

**कर्ण** : नाही, नाही, मी विसरूच शकत नाही. जन्मतःच माझ्या आईनं मला पाण्यात सोडून दिलं?

**कृष्ण** : कर्णा, माझ्याही आईनं मला पाण्यातच सोडलं. त्या पाण्यानं माझाही ग्रास घेतला असता. पण ज्या पाण्यानं मला सांभाळलं त्याच पाण्यानं तुलाही सांभाळलं.

**कर्ण** : तुला सांभाळायला तुझे वडील होते! मला कोण होतं? मला माझ्या आईनं एकटा ... एकटाच टाकून दिलं!

**कृष्ण** : म्हणूनच तू जगलास! नाहीतर तुझ्या आईला तुझा आणि स्वतःचा नाश करण्यावाचून गत्यंतरच नव्हतं.

**कर्ण** : काय जगून उपयोग झाला? हे असं दुःखानं चूर्ण होऊन मरण्यासाठीच ना?

**कृष्ण** : नाही, कर्णा, नाही. तू मरण्यासाठी जन्माला आलेला नाहीस. तू अमर आहेस. मानवजात आहे तोपर्यंत तुझं नाव घेतलं जाईल.

**कर्ण** : टाकून दिलेल्या मुलांचा प्रतिनिधी म्हणून!

**कृष्ण** : होय. टाकून दिलेली सर्व मुलं तुझं नाव अभिमानानं घेतील. टाकून दिलेल्या सर्व मुलांना तुझ्या नावामुळं स्फूर्ती येईल. टाकून दिलेल्या सर्व मुलांना तू प्रेरणा देशील.

**कर्ण** : केवळ टाकून दिलेल्या मुलांनाच ना?

**कृष्ण** : टाकून दिलेल्या मुलांचा तू आदर्शच राहशील. पण कर्णा, खरं सांग, आज ना उद्या सर्वच मातांना मुलांना टाकूनच जायचं असतं ना? कर्णा, अरे या विचित्र जगात आपण सगळेच टाकले गेलो आहोत रे! कुठून आलो कुणास ठाऊक! आपण सगळेच वाट चुकलो आहोत. आपल्या सगळ्यांच्याच आया हरवल्या आहेत. आपण सगळेच भरकटत भटकत आहोत. दिशाच दिसत नाही आहेत!

**कर्ण** : कृष्णा ऽ

**कृष्ण** : कर्णा, असल्या या प्रवासात फक्त एकाच गोष्टीची साथ जिवाची तहान भागवू शकते. कर्णा, तुझ्यासारखा उदार कोणीच नाही. हा कृष्णही तुझ्याकडे याचक म्हणूनच आला आहे.

**कर्ण** : कृष्णा, तू प्रत्यक्ष परमेश्वर, आणि याचक?

**कृष्ण** : होय, कर्णा, होय. परमेश्वरही याचकच आहे! कर्णा, तूही एक याचकच आहेस.

**कर्ण** : शक्य नाही. शक्य नाही. कर्ण देणारा असतो. कर्ण मागणारा नसतो. अरे, तू माझा असा मृत्यू घडवू इच्छितोस?

**कृष्ण** : तू याचक आहेस, म्हणूनच अशांत आहेस.

**कर्ण** : नाही... नाही... नाही... मला काहीही नको आहे. कुणीही नको आहे. नको... नको... नको...

**कृष्ण** : तुला शांती हवी आहे.

**कर्ण** : नाही, तीही नको.

**कृष्ण** : हवी आहे आणि मी ती देणार आहे.

**कर्ण** : नको.

**कृष्ण** : मलाही शांती हवी आहे आणि तू ती देणार आहेस.

**कर्ण** : मी तुला काय देणार, कृष्णा?

**कृष्ण** : जे मी तुला देणार आहे.

**कर्ण** : मला नको असताना?

**कृष्ण** : अरे, जन्मसुद्धा नको असतानाच घडतो.

**कर्ण** : अरे, कसला हा जन्म? मातृप्रेम नाही, कधी सन्मान नाही, उच्च शिक्षण नाही, विवाहसमयी अपमान...

**कृष्ण** : माझीच कहाणी मलाच सांगतो आहेस? अरे, मला तरी जन्मदात्या मातेचा दुधाचा एक थेंब तरी मिळाला का रे? अरे, कंसानं सतत माझा वधच करण्याचा प्रयत्न केला नाही का रे? माझ्या आणि रुक्मिणीच्या विवाहात शिशुपालानं माझ्याही अपमानाची शर्थच केली नाही का रे?

**कर्ण** : पण तू देव-सुर-झालास! मी मात्र सूतपुत्रच ठरलो!

**कृष्ण** : म्हणूनच या महाभारतीय युद्धात मी सूताचीच - सारथ्याचीच- कामगिरी पत्करली. पराक्रमी वीर घोड्यावरून मिरवत असताना मी फक्त घोड्यांचा खरारा केला. त्यांची लीद काढली.

**कर्ण** : बांधवांना – निदान एकाला तरी – मारण्याचं पातक माझ्या हातून घडणार आहे.

**कृष्ण** : माझेही यादवबंधू मी सैन्य म्हणून कौरवांकडेच दिले आहेत! त्यांच्या वधाला मीच कारण होणार आहे. अरे, हे जगच असं आहे!

**कर्ण** : बस्स! माझा एकच मित्र आहे – दुर्योधन. मी त्याला जीवन वाहिलं आहे. मला दुसरा मित्र कधीही नव्हता आणि असणार नाही.

**कृष्ण** : मीही माझं जीवन अर्जुनालाच वाहिलं आहे. मलाही दुसरा मित्र नाही. आपण मित्र नाहीत, कर्णा. आपण एकच आहोत. आपल्यासारखे आपणच. म्हणूनच तुला भेटल्यावाचून मला स्वस्थता लाभणार नाही. एकच क्षण...

**कर्ण** : जन्मतःच मी मरून का गेलो नाही? तो एकच दुःखाचा क्षण मला शाश्वत वरदायी ठरला असता! केवळ दुःखाचा हा असह्य भार उचलण्याचा प्रयत्न करण्यातच सारं जीवन वेचण्याची पाळी तरी माझ्यावर आली नसती. का माझ्या आईनं जन्म दिला आणि मला पाण्यात टाकून दिला?

**कृष्ण** : पाण्यात टाकून दिला नाही, कर्णा. तिला केवळ आपला मान टिकवायचा असता तर तुला तिनं पाण्यात टाकून दिलं असतं. तिनं तुला पाण्यावरून सोडून दिलं.

**कर्ण** : का?

**कृष्ण** : त्याचं उत्तर तुझ्या आयुष्यानं तू दिलं आहेस! अरे, अनंत जन्मांचं दुःख तू हसत पेललं आहेस! अनंत दुःख कोसळलं तरी मनुष्य ते लीलया पेलू शकतो हे तू जगाला दाखवून दिलं आहेस. जगाला दुसरा कोणताही आदर्श नको आहे! जगाला फक्त तुझा हाच आदर्श हवा आहे! आणि तो तू मानवजातीला तिच्या अंतापर्यंत देणार आहेस!

**कर्ण** : कृष्णा!

**कृष्ण** : पण माझ्यापेक्षा, कर्णा, एक विशेषता तुझ्यात अधिक आहे!

**कर्ण** : अधिक?

**कृष्ण** : माझ्या आईनं मला न रडता जन्म दिला. हुंदकाही न देता प्रसूतिवेदना सहन केल्या! कारण जरा चाहूल लागली तरी तुरुंगाचे अधिकारी मला मारायला जागे होतेच. तुझ्या आईनंही हेच केलं. तिला माहिती होतं की आपण एका थोर पुत्राला जन्म देत आहोत. कितीही यातना

झाल्या तरी थोर पुत्रांना जन्म देण्याचं आपलं नियत कार्य आपण केलंच पाहिजे, याची उपजत जाणीव तिला होती. तो सुपुत्र वाचला पाहिजे, वाढला पाहिजे. म्हणून तिनं आपल्या वेणा कोणालाही कळू दिल्या नाहीत. अरे, आपल्या जन्मांसाठी आपल्या आयांनी तोंडं दाबून जन्म दिले! अरे, ओरडण्याचं, रडण्याचं सुखसुद्धा त्यांनी भोगलं नाही– जन्म देतानाही नाही आणि पुढे जन्मभरही नाही!

**कर्ण** : कृष्णा!

**कृष्ण** : आणि कर्णा, माझ्या आईची माझ्या जन्माच्या वेळी आठवी खेप होती, पण तुझ्या आईची कुंतीची कर्णा, पहिलीच वेळ होती रे!

**कर्ण** : कृष्णा!

**कृष्ण** : आणि कर्णा, तू कवचकुंडलं घेऊन जन्माला आलास! तू दिव्य होतास. पण तुला जन्माला घालणं हे तुझ्या आईला दिव्यच होतं रे!

**कर्ण** : आई! ...आई! ...आई! (आक्रोश.)

**कृष्ण** : कर्णा, या महाभारतीय महायुद्धाचं हे महादुःख पेलण्याचं सामर्थ्य मला केवळ तुझ्याकडूनच मिळेल. ये. आपण एकच आहोत. मला कडकडून भेट रे, कर्णाऽ

**कर्ण** : कृष्णा!

(मिठी मारून भेटतात.)

# निम्मी माझी... निम्मी तुझी

(दोन ब्रह्मचाऱ्यांची खोली. समोर मधोमध बंद दार. रमण आणि चमन. म्हणजेच रम्या आणि चम्या. रम्या पूजा आरती करीत आहे. चम्या डिस्को नाच करीत आहे.)

**रम्या** : जयदेव जयदेव जयजय गुरुदेवा
तुम्ही आम्हांला संसार करू द्यावा
आम्ही करितो तुमचा संततचा धावा
आम्हा साह्य कराया धावा हो धावा
जयदेव जयदेव

**चम्या** : ये दिल भडकता है
आ मिल खोलकर बाहे
ये दिल तडपता है
आजा आजा छोडकर राहे

**रम्या** : (चमनकडे रागाने पाहत) जयदेव जयदेव जयजय गुरुदेवाऽ

**चम्या** : मै गुरू तू शिष्या
चल करू प्यार पिया

**रम्या** : गाढवा, तू गुरू नव्हेस. गुरुदेवांचा अपमान करतोस? तू गुरं आहेस. जनावर आहेस. मी आरती करतोय. दिसत नाही? पवित्र वातावरण भंग करतो आहेस?

**चम्या** : मूर्खा, तू माझा मूड घालवतो आहेस? काय मूड जमला होता! ये दिल...

**रम्या** : कसला मूड? सगळा वेडेपणा...

**चम्या** : कसली पूजा? सगळा आंधळेपणा. अंधश्रद्धेचा नाश केलाच पाहिजे.

**रम्या** : तू माझा नाश करतो आहेस. थांबव. थांबव तो टेपरेकॉर्डर.

**चम्या** : तू तुझी घंटा थांबव.

**रम्या** : घंटा कशी थांबवू? हे स्वर्गातल्या देवतांना आवाहन आहे!

**चम्या** : टेपरेकॉर्डर कसा थांबवू? हे या जगातल्या देवतांना आवाहन आहे. तुझ्या स्वर्गातल्या देवता काय चाटायच्या आहेत?

**रम्या** : तू काय या जगातल्या तुझ्या देवता चाटणार आहेस?

**चम्या** : गुरुदेवांचे पाय चाटण्यापेक्षा खूप बरं. वैताग साला! सगळा मूड गेला.

(सिगारेट ओढतो. धूर त्याच्या तोंडावर सोडतो.)

**रम्या** : प्रदूषण! प्रदूषण! अरे ही सिगरेट की डिझेल ट्रकचा एक्झॉस्ट पाईप? बंद कर. बंद कर हा धूर.

**चम्या** : तुझ्या उदबत्त्या? त्यांचा धूर?

**रम्या** : पवित्र आहे.

**चम्या** : मला हे पवित्र मरण नको आहे. तू घे पवित्र मरण.

**रम्या** : मरण नव्हे. त्यानं शांत होतं मन.

**चम्या** : यानं माझं मन शांत होतं. एवढा तुझा उच्छाद असल्यावर मला चेनस्मोकर व्हावं लागणार. (पुनः धूर फेकतो.)

**रम्या** : मी उदबत्त्या नाही विझवणार.

**चम्या** : मी सिगरेट नाही विझवणार.

**रम्या** : घरभर राख.

**चम्या** : आधी तू स्वच्छता राख.

**रम्या** : मी काय वाटेल ते करीन. खोली माझी आहे.

**चम्या** : पण भाडं मी भरतो आहे. तू बेकार आहेस.

**रम्या** : मी फक्त नोकरी नसल्यानं बेकार आहे. तूच खराखुरा बेकार आहेस.

**चम्या** : छोड. माझ्यावर पोरी मरतात. तुझ्याकडे एकजण फिरकत नाही.

**रम्या** : पण पोरींचे बाप माझ्याकडे रांगा लावतात. खोली माझी आहे म्हणून. नोकरी करणारी मुलगी देतो म्हणतात.

**चम्या** : मग अडचण काय?

**रम्या** : तू.

**चम्या** : अरे तुझा खर्चपण मीच चालवतोय. तुला नोकरी कुठाय?

**रम्या** : गुरुदेवांनी सांगितलंय, तुला नोकरी मिळणार. तू कायम नोकर होणार. एकदा नोकरी लागू दे.

**चम्या** : तोवर मला राहू दे. हे बघ. फिफ्टी फिफ्टी. खोली तुझी. भाडं माझं. निम्मी खोली तुझी. निम्मी खोली माझी. ही आपली सीमा. (मधोमध खडूने रेघ आखतो.)

**रम्या** : तू इकडे यायचं नाहीस.

**चम्या** : तू इकडे यायचं नाहीस.

**रम्या** : तुझा धूर इकडे येता कामा नये.
**चम्या** : तुझा धूर इकडे येता कामा नये.
**रम्या** : तुझा आवाज इकडे येता कामा नये.
**चम्या** : तुझा आवाज इकडे येता कामा नये.
**रम्या** : तू इकडे बघायचं नाहीस.
**चम्या** : तू इकडे बघायचं नाहीस.
**रम्या** : तू इकडचं काही ऐकायचं नाहीस.
**चम्या** : तू इकडचं काही ऐकायचं नाहीस.
**रम्या** : बरोबर निम्म्यावर अदृश्य भिंत बघायची.
**चम्या** : भिंतीला खिडकी नाही.
**रम्या** : भिंतीला दार नाही.
**चम्या** : भिंत क्राँक्रीटची.
**रम्या** : भिंत प्लास्टर केलेली.
**चम्या** : फिप्टी फिप्टी
**रम्या** : निम्मी तुझी-निम्मी माझी
**चम्या** : निम्मी तुझी-निम्मी माझी
**दोघे** : (एकदम) निम्मी माझी... निम्मी माझी. (एकदम दार पायाने ढकलून एक तरुणी आत येते. तिच्या अंगावर पंजाबी ड्रेस आहे. तो सरळ दोन रंगांत आहे. पिवळा आणि लाल.)
**निम्मी** : (बरोबर मध्यरेषेवर उभी राहत) माझी वाटणी करता? मी काय भोपळा आहे दोन भाग करायला? निर्लज्ज मेले. खुश्शाल माझं नाव घेतात आणि आपल्या बाची मालमत्ता असल्यागत वाटणी करतात. मी निम्मी. निम्मी देवी. निर्मला देवी. मला निम्मी म्हणतात. पूर्ण माफी मागा माझी.
**रम्या** : अहो पण,
**चम्या** : जरा ऐकून घ्या.
**निम्मी** : आधी माफी. मग खुलासा.
**रम्या** : पण
**निम्मी** : पण लावायला तुम्ही काय अर्जुन लागून गेलेत?
**चम्या** : नाही, नाही...
**निम्मी** : आधी माफी मागता की लोकांना बोलावू?

**रम्या,**

**चम्या** : (एकदम) माफ करा. माफ करा.

**निम्मी** : लक्षात ठेवा, मला निम्मी म्हणतात. मी निम्मी आहे. पुनः म्हणाल, निम्मी माझी, निम्मी माझी?

**रम्या** : नाही, नाही, पाया पडतो. माते, तुला वंदन असो!

**निम्मी** : मला माता म्हणता? माझी बदनामी करता? मी निम्मी कुमारी आहे.

**चम्या** : निम्मी कुमारी?

**निम्मी** : माझं नाव घेता? लाज नाही वाटत? बाबांना बोलावू? बाबाऽ

**चम्या** : नको बाबाऽ. सॉरी, सॉरी, एक्स्ट्रीमली सॉरी. तुम्ही आहात, मग बाबा कशाला?

**रम्या** : पण का येणं केलंत?

**चम्या** : काय काम काढलंत?

**निम्मी** : मी निम्मी मालकीण आहे. परगावी शिकत होते. आता इथे आली आहे. खोली खाली करा.

**चम्या** : अहो, दुसरं काय वाट्टेल ते खाली करायला सांगा हो. वाट्टेल ते खाली करू. पण खोली नका खाली करू.

**निम्मी** : दुसरं काय खाली करणार? बेशरम मेले.

**चम्या** : अहो म्हणजे तसं नाही हो. मी सभ्य पुरुष आहे.

**रम्या** : मीपण सभ्य पुरुष आहे.

**निम्मी** : तुमचं पौरुष मला दाखवता? मी कुंग फू शिकले आहे! (चम्याच्या अंगावर जपानी पद्धतीप्रमाणे ओरडत हल्ला करते.)

**चम्या** : माफ करा. माफ करा. तुमच्याशी मारामारी करायला मला तुमच्यासारखी छाती नाही हो.

**निम्मी** : माझी छाती काढता? कुंग फूऽ

**चम्या** : नाही हो तुमची छाती मी मुळीच काढीत नाही! तुमचे पाय पकडू?

**निम्मी** : माझे पाय पकडणार? माझ्या अंगावर हात टाकणार? मला धरणार?

**चम्या** : माझा धर सुटलाय हो.

**निम्मी** : मी निम्मी आहे. मी कश्शात कम्मी नाही. खोलीचा ताबा मी घेणार म्हणजे घेणार. देता का नाही?

**चम्या** : रम्या, खोली तुझी आहे. तू बोल.

**रम्या** : जय गुरुदेव. जय गुरुदेव. जय गुरुदेव.

**निम्मी** : अहो, ही माझी खोली आहे. मठी नव्हे.

**रम्या** : पण ती मी कशी ठेवली आहे पाहा, पवित्र!

**निम्मी** : आता तुमच्याविरुद्धही मला पवित्रा घेतलाच पाहिजे. बोला, खोली खाली करता की नाही? कुंग फूऽ

**रम्या** : अहो, जरा मला मुदत द्या.

**निम्मी** : मला मुदतीचा ताप नको आहे. मला खोली हवी आहे.

**रम्या** : तुमच्या उदारपणाला थोडी खोली हवी आहे हो.

**निम्मी** : खोली देता की नाही? कुंग फूऽ

**रम्या** : अहो, जरा दया करा हो.

**निम्मी** : दयाबिया हम कुछ जानते नही. मी लष्करात शिरले आहे. लष्करी शिस्त हवी. जा म्हटलं की गेलं पाहिजे. जाऽ

**रम्या** : कुठं जाऊ?

**निम्मी** : लष्करात!

**रम्या** : नको, नको. लष्करात नको. मला लष्करच्या भाकरी भाजायच्या नाहीत.

**निम्मी** : मग इथल्या भाजायच्या नाहीत.

**रम्या** : नाही हो. पण लष्कर नको. नको. नको.

**चम्या** : अरे रम्या, तू बेकार आहेस ना? मग लष्करात जा.

**रम्या** : माझी बेकारी काढतोस? एका बाईसमोर मला बेकार म्हणतोस? (त्याच्या अंगावर धावतो.)

**निम्मी** : अहो, एवढे आक्रमक आहात, तर लष्करात जा. लष्करभरती चालू आहे. तिथं जा अन् भांडा शत्रूशी.

**चम्या** : अहो कॅप्टन बाईसाहेब, तुम्ही लष्करात गेलात ना? मग तुम्हाला ही खोली कशाला?

**निम्मी** : या खोलीचा ताबा घ्यायला. मला ठाऊकच होतं. तुम्ही या खोलीचा ताबा द्यायला नकार देणार. लष्करात गेलं की सरकार सैनिकांना त्यांच्या जागा ताबडतोब मिळवून देतं.

**रम्या** : अहो बाईकॅप्टनसाहेब, तुम्ही लष्करात असाल तेव्हा खोली आम्ही वापरू.

**चम्या** : निम्मी... निम्मी... म्हणजे निम्मीसाहेब... निम्मीसाहेब... आम्ही खोली निम्मीसाहेब वापरू.

**निम्मी** : म्हणजे निम्मी तुमची अन् निम्मी माझी.

**रम्या** : बरोब्बर बोललात. खरोख्खर बोललात. निम्मी आमची. निम्मी

तुमची.

**निम्मी** : लाज नाही वाटत? मी निम्मी आहे. मै मेरी खोली नही दूँगी।

**रम्या** : मग मीपण लष्करात शिरतो. म्हणजे मलापण माझा वहिवाटीचा ताबा मिळेल.

**चम्या** : अन् मला तुमची लष्करी लढाई बघायला मिळेल.

**निम्मी** : चेष्टा करता माझी? थांबा. तुम्हांला दाखवतेच. कुंग फूऽ

**रम्या** : अहो, बाई कॅप्टनसाहेब, मला लष्करात शिरण्याचा मार्ग तरी दाखवा. तुम्ही लष्करात असल्यावर मला मुळीच भीती वाटणार नाही.

**चम्या** : कॅप्टनसाहेबबाई, मला पण दाखवा. तुम्ही या खोलीची राणी आहात.

**रम्या** : तू काय स्वतःला खोलीचा राजा समजतोस?

**चम्या** : तू खोलीचा गुलाम आहेस.

**निम्मी** : थांबा. थांबा. तुमची शक्ती वादात घालू नका. तुम्हांला आपण लष्करात घालू. तुमची निम्मी शक्ती नुसती वादात खर्च होते. ती निम्मी शक्ती लष्करात घाला.

**चम्या** : लष्कराचा मार्ग लवकर दाखवा. तुमच्यामागे लष्करही मला सुकर वाटेल. दुसरी नोकरी मी सोडून देईन आणि तुमची नोकरी मी धरीन.

**रम्या** : (खुर्ची खोलीच्या आपल्या विभागात ठेवीत) बसा ना बाई... साहेब.

**चम्या** : (खुर्ची खोलीच्या आपल्या विभागात खेचीत) बसा ना बाईसाहेब.

(दोघे खुर्चीची रस्सीखेच करतात. खोलीत खुर्ची एकच आहे.)

**निम्मी** : तुम्ही काय खुर्चीखेच खेळताय?

**चम्या** : आम्ही आमच्या नशिबाची परीक्षा घेतोय.

**रम्या** : चम्या, चम्या, मगाशी ठरल्याप्रमाणे... नाही... अं... सुवर्णमध्य गाठू या.

(खुर्ची बरोबर मध्यभागी म्हणजे सीमारेषेवर ठेवतात. निम्मी खुर्चीवर बसते. ती बोलताना एकदा एकीकडे तर दुसऱ्यांदा दुसरीकडे झुकते. तेव्हा आपल्या भागात ती आहे म्हणून तिच्याजवळ जाण्याचा दोघे प्रयत्न करतात व दुसऱ्याने पाहता कामा नये म्हणून इशारे करतात.)

**निम्मी** : लष्कराचा मार्ग मरणाच्या मैदानातून जातो.

**रम्या** : अरे बाप रे! नको रे बाबा नको नको!

**निम्मी** : मरणाच्या मैदानातून जीवनाच्या शिखराकडे जातो.

**चम्या** : छान छान. अस्सं पाहिजे.

**निम्मी** : लष्करात जायचं म्हणजे उत्साह पाहिजे. (उठून एकावर धावते.

दुसरा अदृश्य भिंतीपर्यंत येऊन धडकतो.)

**निम्मी** : लष्करात जायचं म्हणजे आक्रमकता पाहिजे. (दुसऱ्याच्या अंगावर धावून जाते. आता दोघांची टक्कर होणार म्हणून दुसरा भिंतीपर्यंत येऊन बघतो. पण भिंतीला अडतो.)

**निम्मी** : लष्करात जायचं म्हणजे आकांक्षा पाहिजे. (दुसऱ्या बाजूला धावते. त्या दोघांची वरीलप्रमाणेच धावपळ होते.)

**निम्मी** : लष्करात जायचं म्हणजे लष्करी गुण पाहिजेत.

**दोघे** : म्हणजे काय?

**निम्मी** : ते लष्करात गेल्याशिवाय कसं कळणार? ते सांगता येत नाहीत पण ते अंगात असावे लागतात. तुम्हांला ते माझ्यात दिसत नाहीत?

**चम्या** : तुमच्या अंगात आम्हांला पुष्कळ काही दिसतंयहो.

**रम्या** : तुमच्याकडून आम्हांला खूप काही मिळतंयहो.

**निम्मी** : बोला, लष्करी नोकरीचा विजय असो!

**दोघे** : विजय असो!

**रम्या** : लष्करी नोकरीतून मिळणाऱ्या खोलीचा...

**दोघे** : विजय असो!

**निम्मी** : तुमची खोली सुटत नाही? थांबा, तुम्हांला हाकलतेच. मी कॅप्टन आहे. (त्यांच्यामागे झाडू घेऊन लागते. इतक्यात तिच्या अंगावर झुरळ पडते. ती ओरडते. ते दोघे झुरळ काढायला धडपडतात. ती पळते. तिच्यामागे दोघे बाहेर पळतात.)

# विमानात लोकशाही

(आकाशात विमान चाललेले आहे. समोर कॅप्टन आणि प्रवासी दिसत आहेत.)

**कॅप्टन** : युवर अटेन्शन, प्लीज. कृपया, सर्वांनी लक्ष द्यावे. विमान एअरपॉकेटमध्ये, हवेच्या कमी दाबाच्या, वादळाच्या पट्ट्यात शिरत आहे. सर्वांनी कमरेचे पट्टे बांधा.

**नेता** : ही हुकूमशाही आहे. तुम्ही एकट्याने हुकूम द्यायचा आणि आम्ही सर्वांनी तो मुकाट्याने पाळायचा?

**कॅप्टन** : अहो, मी या विमानाचा चालक आहे.

**नेता** : मी या देशाचा चालक आहे. ही जनता या विमानाची मालक आहे. तुम्ही या जनतेचे सेवक आहात.

**कॅप्टन** : म्हणूनच मी जनतेला सूचना करतो आहे. सर्वांनी कमरेचे पट्टे बांधा. लवकर बांधा.

**नेता** : एका जागेवर बसून सूचना सोडायच्या ही कसली समाजसेवा? त्यासाठी जनतेत मिसळून जनतेची लोकप्रियता मिळवली पाहिजे. माझ्यामागे सारी जनता आहे. तुमच्यामागे कोण आहे? बोला, जनतेचाऽ

**सर्वजण** : विजय असो!

**सर्वजण** : आमच्या नेत्याचा विजय असो! नेताजी, तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है।

**नेता** : प्रिय देशबांधवहोऽ

(एकजण येऊन त्याला मोठा हार घालतो. लगेच 'नेताश्रींचाऽ विजय असो' असा जयजयकार होतो.)

**कॅप्टन** : आजचा प्रश्न एक महान प्रश्न आहे. आजची समस्या एक महान समस्या आहे. आजचं संकट हे एक महान संकट आहे. याला तोंड द्यायला तुम्ही मला एकमुखानं पाठिंबा दिला पाहिजे. याच्याशी मुकाबला करायला तुम्ही मला एकमतानं बळ दिलं पाहिजे. या

संकटाशी दोन हात करायला तुम्ही माझे हात बळकट केले पाहिजेत.

**सर्वजण** : नेताश्रींचा विजय असो!

**कॅप्टन** : अहो, माझं ऐका. नाहीतर डोकी फुटली म्हणून रडू नका.

**नेता** : आमचा अपमान करतो? लोकांनी प्रचंड मतांनी निवडून दिलेल्या लोकप्रिय पुढाऱ्याची अवज्ञा करतो?

**कॅप्टन** : महान नेताश्री, कृपा करून माझं ऐका. पट्टे घट्ट बांधा. लवकर बांधा.

**नेता** : आम्हांला बंधनांत ठेवतो? आम्ही क्रांतिकारक आहोत. बोला, क्रांतीचाऽ

**सर्वजण** : विजय असो!

**नेता** : आणि नोकरशाहीचा धिक्कार करा. बोला, नोकरशाहीचा ऽ

**सर्वजण** : धिक्कार असो!

**कॅप्टन** : अहो, माझं ऐका. हे विमान या संकटातून पार पडायचं असेल तर माझं ऐका.

**नेता** : लोकशाही नोकरशाहीच्या विळख्यात सापडली आहे. हेच मोठं संकट आहे. लोकहो, माझं ऐका. मालकावर मात करतो तो नोकर कसला? हा नोकरच हाकला.

(यापुढे नेता काही बोलला की लोक 'विजय असो' म्हणतात.)

**कॅप्टन** : अहो, हे विमान चालवणं हा विषय तुमचा नव्हे. हा तज्ज्ञांचा विषय आहे. या बाबतीत तुम्ही बोलू नका.

**नेता** : आमची मुस्कटदाबी करतो? आम्हाला कळत नाही असं म्हणतो? हा आमचा विषय नाही असं सांगतो? हे विमान कुणाचं आहे? साऱ्या जनतेचं आहे! जनतेनंच याची देखभाल करायला आम्हाला निवडून दिलं आहे. आम्ही तुम्हाला आमचा नोकर नेमलं आहे. तुम्हीच आमचं ऐका. मुकाट्यानं आपलं काम करा.

**सर्वजण** : शाब्बास! शाब्बास! असा नेता पाहिजे! नेताश्रींचा विजय असो!

**कॅप्टन** : अहो, हे यंत्र बघा. हवेचा दाब प्रचंड प्रमाणावर कमी होतो आहे. हवेत मोठ्ठा खड्डा पडला आहे. आपलं विमान त्या खड्ड्यात जाणार!

**नेता** : मग तू काय करणार? खुश्शाल सांगतो, 'विमान खड्ड्यात जाणार!' आम्ही तुला काढून टाकणार!

**कॅप्टन** : अहो, मग हे विमान कोण चालवणार?

**नेता** : तिथे आमच्या विश्वासातला माणूस आम्ही नेमणार! पाहता काय? पकडा याला.

**कॅप्टन** : अहो, हे विमान...

**नेता** : ही माझ्या यशाची कमान. पकडा त्याला.

(लोक त्याला पकडायला धावतात. तो इकडेतिकडे पळतो.)

**नेता** : आम्हांला बंधनात टाकत होता, नाही का? यालाच बांधून ठेवा. (त्याला बांधतात.)

**कॅप्टन** : विमान... माझं विमान... आपलं विमान.

**नेता** : कशी फजिती झाली! आमच्या डोक्यावर मिरी वाटतो नाही का? कसा इंगा दाखवला!

**कॅप्टन** : अहो, हे विमान...

**नेता** : इतक्या संकटांवर मात करून मी विजयी झालो. त्यापुढं हे काहीच नाही.

**कॅप्टन** : अहो, मला खाली विमानतळावर फोन तरी करू द्या.

**नेता** : तसा अर्ज करा. आम्ही विचार करू.

**कॅप्टन** : अहो, अर्जंट फोन केला पाहिजे हो.

**नेता** : तुम्ही तळावरच्या तुमच्या लोकांशी संपर्क साधणार? म्हणजे तुम्ही सर्व तंत्रज्ञ संगनमत करणार. आम्हाला कळत नाही म्हणणार आणि आम्हाला फसवणार! ते काही नाही.

**कॅप्टन** : अहो, तळावर आगीचा बंब, ॲम्ब्युलन्स मदतपथकं तयार ठेवली पाहिजेत हो.

**नेता** : काय, यांतलं काही तयार नाही?

**कॅप्टन** : अहो, काय सांगू? सर्व जय्यत तयार असतंच. पण सावध करावं लागतं.

**नेता** : म्हणे, तयार असतं पण सावध करावं लागतं. तुम्ही काय बोलता तुम्हाला तरी कळतं का? हवाई सुंदरी कुठे आहे?

**कॅप्टन** : त्या आत रिफ्रेशमेन्ट तयार करीत आहेत.

**नेता** : आणा. लवकर रिफ्रेशमेंट आणा.

(हवाई सुंदरी येऊन सर्वांना डिशेस देते.)

**नेता** : हे काय? हॉटेलातून तयार आलेल्या डिशेस लोकांच्या हातांत देणं, एवढंच यांचं काम? बाईंचं काम गाणं म्हणणं, नाच करणं...

**सुंदरी** : आता विमान हवाई खड्ड्यात गेलं की सगळ्यांचाच नाच सुरू होईल; आणि डोकी फुटून रंगली म्हणजे सगळ्यांचीच गाणी रंगतील.

**नेता** : बाई, तुम्ही आमचं ऐकत नाही?

**सुंदरी** : माझं काम मी करते आहे.

**नेता** : हे कसलं काम? नुसता नट्टापट्टा!

**सुंदरी** : सर्वांनी ताबडतोब पट्टा बांधा.

**लोक** : पट्टा बांधता येत नाही.

**सुंदरी** : मी दाखवते तसं बांधा. आणि आधी कॅप्टनना सोडा.

**नेता** : तुम्ही पक्षपात करता. आम्हाला बांधता आणि कॅप्टनला मात्र सोडता?

**सुंदरी** : अहो तुम्ही प्रवासी आहात. ते कॅप्टन आहेत.

**नेता** : तुम्ही आमचे नोकर आहात.

**सुंदरी** : त्यांची जागा वेगळी आहे. तुमची जागा वेगळी आहे.

**नेता** : तुम्ही विषमता करता.

**सुंदरी** : तुम्हीपण कॅप्टन बनू शकता. शिका आणि बना.

**नेता** : तुम्ही आम्हाला बनवता काय? आम्ही नाही बनणार! सगळेच जण कॅप्टन झाले तर नेता कोण बनणार? आणि माझ्यासारखा नेता तर बनतच नाही. माझ्यासारखा नेता जन्मावा लागतो. कॅप्टन काय जन्माला येतो?

**सुंदरी** : अहो, आता मरायची वेळ आलीय. जागे व्हा.

**नेता** : आम्ही जागेवरच आहोत. आम्ही आता झोपणार. तुम्ही आमच्या नोकर आहात. नोकर जागे राहिले पाहिजेत. आमचं काम आम्ही करतो. तुमचं काम तुम्ही करा. आम्ही झोपतो.

**सुंदरी** : झोपा आणि गप्प व्हा.

**नेता** : आम्ही झोपायचं अन् तुम्ही दोघांनीच जागं राहायचं?

**सुंदरी** : म्हणजेच विमान वाचेल. (कॅप्टनला सोडवायला जाते.)

**नेता** : ते काही नाही. मीच जागणार. मीच कॅप्टनच्या जागेवर बसणार.

**सुंदरी** : अहो, तुम्ही या माझ्याबरोबर. धावा, धावा, यांना धरा. विमान वाचवा. (पळू लागते.)

**सर्वजण** : आमच्या लाडक्या नेत्याचा विजय असो! (हार घालतात.)

**नेता** : बाईंनापण बांधून ठेवा. (लोक तिला बांधतात.) आता मीच

विमान चालवतो. त्यात काय? विमान चालतंच.

(नेता कॅप्टनच्या जागेवर बसतो. लोक मोठा जयजयकार ‘विजय असो, विजय असो’ करतात. विमानाचे धडाडधूम होते.)

# वेड्यांच्या इस्पितळात लोकशाही

(वेड्यांचे इस्पितळ. अर्थातच संपूर्णपणे काल्पनिक. एकजण रसायन शास्त्रज्ञ बनून मातीच्या आणि खडूच्या गोळ्या करीत आहे. एक पुढारी गळ्यात हार झेंडूच्या, कण्हेरीच्या व कर्दळीच्या फुलांचा घालून लाख लोकांसमोर भाषण केल्याच्या नादात आहे. एक लष्करी अधिकारी आकाशकंदिलासारखा बाँब घेऊन फिरत आहे. एक स्वतःला आंधळा समजून इतरांना टक्कर देत चालत आहे. एक तळ्यात चालल्यासारखा चालत आहे. एक हिंदी सिनेमातील प्रेमवीर छातीवर भग्न हृदय बांधून हिंडत आहे. एक गायन तर एक नृत्य करीत आहे. काही भिन्नभिन्न धर्मवीर इ.)

**पुढारी** : (एकदम पुढे येऊन) वेड्यांनो, जागे व्हा!

**एक वेडा** : काय, वेडातून जागे व्हा?

**पुढारी** : नाही. वेडे म्हणूनच जागे व्हा. वेडे म्हणूनच उठा. वेडे म्हणूनच लढा. गर्वसे कहो, हम पागल है।

**सर्वजण** : हम पागल है।
हम सब पागल है
दुनिया के दिवाने है
वेडा असतो सुखी
वेडा नाही दुखी
जग वेडे करायचे आहे!
शहाणे असतात खोटे
चोर, बदमाष मोठे
वेडा आपल्या वेडातच राहे!
सगळे वेडे झाले तर
सगळे सुंदरच सुंदर
हीच जगाची आशा आहे!

**पुढारी** : अखिल जगातील वेड्यांनोऽ

**सर्वजण** : एक व्हा!

**पुढारी** : वेड्यांच्या एकजुटीचाऽ

**सर्वजण** : विजय असो!

**पुढारी** : अखिल जगातील वेड्यांचा ऽ

**सर्वजण** : विजय असो!

**पुढारी** : या जगातील सगळ्यांत जास्त जबरदस्त अन्यायग्रस्त कोणी असतील तर हे फक्त वेडेच होत. वेड्यांवरील अन्यायाचा ऽ

**सर्वजण** : विजय असो!

**पुढारी** : वेड्यांनो, शाब्बास! तुम्ही अस्सल वेडे आहात! पण म्हणा, धिक्कार असो!

**सर्वजण** : धिक्कार असो!

**पुढारी** : शतकानुशतके वेड्यांना तुरुंगात टाकले. शतकानुशतके वेड्यांचा छळ केला. शतकानुशतके वेड्यांचा अपमान केला. वेड्यांचे हक्क ऽ

**सर्वजण** : मिळालेच पाहिजेत.

**पुढारी** : वेडा राष्ट्रपती

**सर्वजण** : झालाच पाहिजे.

**लष्करी अधिकारी**: वेडा सेनापती–

**सर्वजण** : झालाच पाहिजे.

**लष्करी अधिकारी**: जगातले सर्व ॲटम बाँब त्याच्या ताब्यातऽ

**सर्वजण** : दिलेच पाहिजेत.

**पुढारी** : वेडा सगळ्या बँकांचा प्रमुख

**सर्वजण** : झालाच पाहिजे.

**प्रेमवेडा** : प्रेमवेड्या बेकारांना पेन्शनऽ

**सर्वजण** : मिळालेच पाहिजे.

**पुढारी** : वेड्यांचे राज्य

**सर्वजण** : झालेच पाहिजे.

**धर्मगुरू** : वेड्यांचा धर्म सगळ्या जगावर

**सर्वजण** : झालाच पाहिजे.

**पुढारी** : सगळे जग वेडे

**सर्वजण** : झालेच पाहिजे.

**पुढारी** : सर्वांत मोठी विषमता वेडे आणि शहाणे! विषमता दूर

**सर्वजण** : झालीच पाहिजे.

**पुढारी** : इतके दिवस शहाण्यांनी राज्यं केली. जग खड्ड्यात घातलं. वेड्यांना संधी

**सर्वजण** : मिळालीच पाहिजे.

**पुढारी** : वेड्यांची संस्कृती सर्वांत प्राचीन संस्कृती. बाकी संस्कृती काही हजार वर्षांच्या आहेत. आमची संस्कृती काही लाख वर्षांची आहे. (तसा नाचतो. टाळ्या वाजवतो. सगळे नाचतात. टाळ्या वाजवतात) वेड्यांच्या थोर संस्कृतीचा

**सर्वजण** : विजय असो!

वेड्या, तूच खरा आधार
जगाचा तूच खरा आधार
  आम्ही वेडे म्हणुनि शहाणे
  मिरविती जगी अभिमानाने
वेडे हवेमधी तरंगति शहाणे भुइलाभार वेड्या तूच खरा आधार।। ध्रु.।।
  कोण शहाणा असा जन्मला
  शहाण्पणाने सुखात जगला
वेडा झाला तरच जगावे येथे दीवस चार वेड्या तूच खरा आधार ।। ध्रु.।।

**पुढारी** : प्रिय वेड्या बंधुभगिनींनो, आता आपण सभा घेऊ या. ठराव करू या. सगळ्या जगाला वेडं करण्याची पंचवार्षिक योजना जाहीर करू या. बसा. बसा. अध्यक्ष मीऽ

**सर्वजण** : नाही. नाही. अध्यक्ष मी. अध्यक्ष मी. अध्यक्ष मी.

**पुढारी** : ठीक आहे. ठीक आहे. सगळेच अध्यक्ष. माननीय अध्यक्षांनो, आपला एक कलमी कार्यक्रम मी जाहीर करीत आहे. सगळं जग वेडं ऽ

**सर्वजण** : झालंच पाहिजे!

**पुढारी** : ठराव पास?

**सर्वजण** : ठराव पास!

**पुढारी** : चला. उठा. कामाला लागा. ध्येय प्राप्त झाल्याशिवाय थांबू नका.

**एक जण** : अहो, पण कार्यक्रम? करायचं काय?

**पुढारी** : करायचं काय? अस्सल वेडे व्हा. खरेखुरे वेडे व्हा. म्हणजे तुमचे लोकही वेडे होतील. जगाला वेडे करण्याच्या कामाला सुरुवात करा.

(सर्वजण टाळ्या वाजवतात. इकडे तिकडे धावू लागतात.)

**शास्त्रज्ञ** : सापडलीऽ सापडलीऽ

**सर्वजण** : कोण? कोण सापडली?

**शास्त्रज्ञ** : गोळी सापडली! शहाण्याला वेडं करण्याची गोळी सापडली! युरीन... युरीन..

**पुढारी** : युरीन नको.

**शास्त्रज्ञ** : पाहिजे.

**सर्वजण** : पाहिजे. पाहिजे. पाहिजे.

**पुढारी** : हो. हो. पाहिजे. पण युरेका. युरीन नव्हे.

**शास्त्रज्ञ** : तेच ते.

**सर्वजण** : तेच ते. शाब्बास! वाहवा! छान छान!

**एक वेडा** : मी तुला नबल प्राईझ देतो. न-ब-ल प्राईझ. एवढा मोठा शोध कधीच लागला नव्हता. बोला, वेड्या शास्त्रज्ञाचाऽ

**सर्वजण** : विजय असो!

**एक वेडा** : गोळीचा ऽ

**सर्वजण** : विजय असो! आम्हांला गोळी पाहिजे. गोळी पाहिजे. गोळी पाहिजे.

**शास्त्रज्ञ** : अहो, आपण वेडे ना? आपल्याला गोळी नको. गोळी शहाण्यांना पाहिजे. पण...

**सर्वजण** : पण काय?

**शास्त्रज्ञ** : (मोठ्याने रडू लागतो.) माझी संधी वाया गेली. मी चुकलो. मी फसलो.

**पुढारी** : अरे अरे अरे अरे, गोळी चुकली?

**शास्त्रज्ञ** : नाही हो. गोळी बरोब्बर झाली हो.

**पुढारी** : मग काय?

**शास्त्रज्ञ** : मी बरोब्बर नाही झालो. (रडतो.)

**पुढारी** : तुम्हाला बरोब्बर कशाला व्हायचंय? तुम्हाला वेडंच राहायला पाहिजे ना? तुम्ही आम्हांला सोडून जाणार? आमची फसवणूक करणार?

**शास्त्रज्ञ** : नाही हो. मी तुमच्यांतलाच आहे. ठार वेडा आहे.

**सर्वजण** : वेड्यांचा विजय असो!

**शास्त्रज्ञ** : पण माझ्या प्रयोगात फार मोठी चूक राहिली.

**सर्वजण** : अरे अरे अरे अरे!

**पुढारी** : कोणती?

**शास्त्रज्ञ** : आर्किमिडीज मोठा कसा झाला?

**पुढारी** : पाण्याचा नियम सांगितला म्हणून.

**शास्त्रज्ञ** : नाही. नागवा पळाला म्हणून! तो रस्त्यात नागवा पळाला. म्हणून मोठा झाला. मी नागवं होण्याचं विसरलो. (मोठ्याने रडतो.)

**एक वेडा** : रडू नको. रडू नको. मी होईन हं तुझ्यासाठी नागवा.

**पुढारी** : मीपण होईन.

**सर्वजण** : मीपण होईन. मीपण होईन.

**पुढारी** : (गाणे सांगतो. सर्वजण मागोमाग म्हणतात)

सगळे नागवे होऊ या
रस्त्यांमध्ये धावू या
झाडे असती नागवी
जनावरेही नागवी
माणसे पाहिजेत नागवी
कशास वस्त्रे नवीनवी
कपडे म्हणजे विषमता
कपड्यांमध्ये का लपता
सगळे नागवे होऊ या
रस्त्यांमध्ये धावू या

**पुढारी** : सर्व अध्यक्षांची ही सभा आदेश देत आहे – एक साथ सब लोक नागवे हो जाव!

**एकजण** : तुम्ही कोण आदेश देणार? आधी करून दाखवणार तोच आदेश देणार. आदेश मी देणार.

**दुसरा** : बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले! हे पाहा मी कपडे टाकले. पायां पडा. पायां पडा. अरे अरे अरे! माझी नाडी बंद पडली.

**सर्वजण** : माझी चालू आहे. पायां पडा. पायां पडा. माझ्या. माझ्या. मी. मी.

(दंगल, मारामारी सुरू. बाहेरून डॉक्टर येतो.)

**डॉक्टर** : थांबा. थांबा. शांत व्हा. शांत व्हा.

**पुढारी** : तुम्ही कोण आदेश देणार? तुम्ही आदेश देऊच शकत नाही.

**डॉक्टर** : मी डॉक्टर आहे.

**पुढारी** : तुम्ही डिक्टेटर आहात. हुकूमशहा आहात. अन्याय करताहात. विषमता माजवताहात.

**डॉक्टर** : औषधाची आणि शॉकची वेळ झाली आहे.

**पुढारी** : फार झालं आहे. आजवर खूप सोसलं आहे. आता तुम्हालाच वेडं करायची वेळ आली आहे. डॉक्टर वेडेऽ

**सर्वजण** : झालेच पाहिजेत.

**पुढारी** : तुम्ही स्वतःला शहाणे समजता? वेगळे मानता? आमचा अपमान करता? डॉक्टरांचाऽ

**सर्वजण** : धिक्कार असो!

**डॉक्टर** : चला. रांग लावा. शॉक दिला पाहिजे.

**पुढारी** : या डॉक्टरालाच शॉक दिला पाहिजे.

**सर्वजण** : पकडा. डॉक्टरला पकडा. (डॉक्टर पळू लागतो.) पळू देऊ नका. पकडा. (सर्वजण डॉक्टरला पकडतात. डॉक्टर ओरडतात. सर्वजण हसू लागतात.) आणा. शॉक द्यायचं यंत्र आणा. (डॉक्टरांच्या डोक्याला शॉक देण्याचे पॉइंट्स चिकटवतात.)

**डॉक्टर** : मेलो. मेलो. सोडा. सोडा.

**पुढारी** : आता कसं वाटतंय? आम्हांला शॉक देताना मजा वाटली ना? आता घे.

**डॉक्टर** : वाचवा. वाचवा. धावा हो धावा. कुणीतरी या हो या (धडपड करतो.)

**पुढारी** : धरून ठेवा. पळू देऊ नका. या सत्कार्याला सगळ्यांचा हातभार लागलाच पाहिजे. सर्वजण पुढे या आणि या डॉक्टरला घट्ट धरून ठेवा.

**डॉक्टर** : पायां पडतो हो. मला सोडा. शॉक नाही देणार. मी तुम्हांला वाचवतो.

**सर्वजण** : आम्हांला फसवतो? या वेड्यांना फसवतो? नाही सोडणार.

(सर्वजण डॉक्टरला धरून ठेवतात. टेबलावर झोपवतात. डॉक्टर 'नको... नको' ओरडत असतो. सर्वजण मोठ्याने हसत असतात. पुढारीपण एका हाताने डॉक्टरला धरून दुसऱ्या हाताने वीज सुरू करतो. सगळ्यांनाच शॉक बसतो. सगळेच मोठ्याने ओरडतात आणि आडवे पडतात.)

# महाभारतात लोकशाही

(महाभारतातील एक शिबिर. बाहेरून दोन्ही बाजूंनी घोड्यांचे खिंकाळणे आणि हत्तींचे चीत्कार ऐकू येतात. मग शंख, भेरी, तुतारी इत्यादी वाद्ये वाजतात. एका बाजूने 'कौरवांचा विजय असो' अशा घोषणा होतात तर दुसऱ्या बाजूने 'पांडवांचा विजय असो' अशा घोषणा होतात. घोषणायुद्ध चालू असतानाच-)

**द्यूताचार्य** : (आवेगाने पुढे येत, खांद्यावर धनुष्य) कोणाचा तरीऽ

**सोमाचार्य** : (तोमर घेऊन येत) विजय असो! ... पण काय हो, तुम्ही पांडव की कौरव?

**द्यूताचार्य** : ते अजून ठरायचं आहे. (इकडेतिकडे धावत) पण मी क्षत्रिय आहे. क्षत्रियाचं कर्तव्य मला पार पाडलंच पाहिजे. (हाताला फासे टाकण्याची कायम सवय लागली आहे.)

**सोमाचार्य** : मी अशी घोर प्रतिज्ञा करतो की महाभारतीय युद्ध संपून कोणाचा तरी विजय होईपर्यंत मी सोमप्राशन सोडणार नाही. (जवळच्या कमंडलूतून सोम पितो.)

**द्यूताचार्य** : आपलं शुभ नाम?

**सोमाचार्य** : आपलं शुभ नाम?

(इतक्यात 'आमचा विजय असो' अशा घोषणा करीत त्रिशूल घेऊन निद्राचार्य, तलवार घेऊन भोजनाचार्य, भाला घेऊन नृत्याचार्य आणि चक्र घेऊन सुंदराचार्य प्रवेश करतात. घोषणा चालू असताच आपापली शस्त्रे उगारून दोघादोघांच्या युध्यमान जोड्या उभ्या राहतात. युद्ध होणार, इतक्यात 'थांबा, थांबा' असा गंभीर स्वर करीत लोकाचार्य तथा संख्याचार्य अवतीर्ण होतात.)

**लोकाचार्य** : थांबा, शस्त्रे खाली करा. युद्धाचा मुहूर्त अजून सापडायचा आहे. तोपर्यंत प्रेमाच्याच गोष्टी करा.

(गळ्यांत हार घालून सर्वांना नमस्कार करीत फिरतात.)

**निद्राचार्य** : मुहूर्त काढून देणारे ऋषी असतात, तसे मुहूर्त काढून न देणारे ऋषी नसतात का हो? (झोपेच्या झोकांड्या खातो.)

**लोकाचार्य** : चांगला प्रश्न विचारलात. आपण कोण?

**निद्राचार्य** : आम्ही क्षत्रिय. रणांगणावर पडणं हाच आमचा धर्म. म्हणूनच

रणांगणावर पडण्यासाठीच आम्ही येथे अवतरलो आहोत. आम्ही आता पडतो. (एका चबुतऱ्यावर लेटतो.) आमचा विजय असो! हो, आपण नाव विचारलंत. चांगलं केलंत. आम्ही नवीन नाव धारण केलं आहे. आम्ही निद्राचार्य! आपण कोण? कृपा करून आम्हाला गाढ निद्रा लागण्यापूर्वीच सांगा.

**लोकाचार्य** : एकमेकांना मारून मरण्यापूर्वी आपण एकमेकांचा परिचय करून घेऊ या.

**द्यूताचार्य** : आम्ही द्यूताचार्य! (द्यूत चालू आहे.)

**सर्वजण** : विजय असो!

**सोमाचार्य** : आम्ही सोमाचार्य! (सोमपान चालूच.)

**सर्वजण** : विजय असो!

**सुंदराचार्य** : आम्ही सुंदराचार्य! (बरोबर सुंदरीची तसबीर.)

**सर्वजण** : विजय असो!

**भोजनाचार्य** : आम्ही भोजनाचार्य! (खात खात.)

**सर्वजण** : विजय असो!

**लोकाचार्य** : विजय असो! सर्वांचाच विजय असो! कोणाचाच पराभव नसो! आम्ही लोकाचार्य. आम्ही सगळ्या लोकांचे हितचिंतक. रामाचे भले. रावणाचे भले.

**द्यूताचार्य** : अहो पण लोकाचार्य, आपण युद्धभूमीवर आहोत ना? युद्धात आणि द्यूतात कोणी तरी हरणारच!

**लोकाचार्य** : कोणीच हरणार नाही असा खेळ शोधून काढण्याचं चिंतन आम्ही करीत आहोत.

**सर्वजण** : लोकाचार्यांचा विजय असो!

**लोकाचार्य** : युद्ध करून कोणीच मरणार नाही असं युद्ध आम्ही शोधून काढणार आहोत.

**सर्वजण** : लोकाचार्यांचा विजय असो!

**लोकाचार्य** : शत्रुमित्र, दुष्टसुष्ट, गुणीअवगुणी कसेही असोत पण सगळेच लोक जगले पाहिजेत.

**सोमाचार्य** : धिक्कार! धिक्कार! लोकाचार्यांचा धिक्कार असो! क्षत्रियांनो, जागे व्हा. तुम्ही पांडव असा. कौरव असा. जागे व्हा. प्रथम या लोकाचार्यांचाच नाश करा. (लोकाचार्यांवर शस्त्र रोखतो.)

**निद्राचार्य** : का?

**सोमाचार्य** : कृती प्रथम. स्पष्टीकरण नंतर. (सर्व क्षत्रिय आपापली शस्त्रे लोकाचार्यांवर रोखतात व फेर धरून त्यांच्याभोवती फिरत राहतात.)

**सोमाचार्य** : लोकाचार्य, आम्ही क्षत्रिय आहोत. कुणाला ना कुणाला ठार मारणे हा आमचा धर्म आहे. सर्वांनाच जिवंत ठेवायचं म्हटलं तर आम्ही कसे जिवंत राहणार? आणि आम्ही जिवंत राहिलो नाही तर जग कसं जिवंत राहणार?

**सर्व क्षत्रिय** : सोमाचार्यांचा ऽ विजय असो!

**सोमाचार्य** : उगारा, उगारा ती शस्त्रे आणि मारा.

(सर्वजण शस्त्रे उगारतात. मारणार इतक्यात)

**लोकाचार्य** : मला माराल तर तुम्हीच मराल. माझं ऐकाल तरच जगाल. मी तर कौरव आणि पांडव या दोघांनाही जीवदान देऊ शकतो. असा महान मंत्र मला सापडला आहे!

**सर्वजण** : कौरव आणि पांडव या दोघांनाही जीवदान?

**लोकाचार्य** : होय. होय. दोघांनाही जीवदान.

**सुंदराचार्य** : कौरवांना जीवदान?

**लोकाचार्य** : होय. होय. कौरवांना जीवदान!

**भोजनाचार्य** : पांडवांना जीवदान?

**लोकाचार्य** : होय. होय. पांडवांना जीवदान!

**निद्राचार्य** : (झोपेतून उठत) आणि आम्हांला?

**लोकाचार्य** : होय. होय. तुम्हालाही जीवदान.

**सोमाचार्य** : सर्वांना जीवदान?

**लोकाचार्य** : होय. अगदी एकूणएक सर्वांना जीवदान.

**सोमाचार्य** : लोकाचार्यांचाऽ

**सर्वजण** : विजय असो!

**सोमाचार्य** : असला कसला दृष्टान्त आपल्याला झाला आहे, लोकाचार्य?

**लोकाचार्य** : तेच सांगतो, पण मला आधी सांगा, तुम्हांला सर्वांना फुकट मरायचं आहे की सगळ्यांसकट जगायचं आहे?

**सर्वजण** : जगायचं आहे. जगायचं आहे. जगलं पाहिजेच. जगणं हाच धर्म. मरण हा अधर्म.

**लोकाचार्य** : मग माझं ऐका. आधी मला ऐकवा की तुम्हाला का जगायचं आहे?

**निद्राचार्य** : हे काय विचारणं? ज्या अर्थी प्रत्यक्ष परमेश्वरानं आपल्याला जन्माला घातलंय त्याअर्थी परमेश्वराची इच्छा आपण पार पाडलीच पाहिजे.

**सर्वजण** : निद्राचार्यांचा विजय असो!

**लोकाचार्य** : तरीपण आपला खास जीवितहेतू प्रत्येकानं सांगितला पाहिजे. प्रथम निद्राचार्य.

**निद्राचार्य** : जगातलं जगण्यातलं सर्वोच्च सुख कोणतं म्हणाल तर, निद्रा! म्हणून घोर निद्रा घेण्यासाठी आम्हाला जगायचं आहे. (आडवे पडतात.)

**सर्वजण** : निद्राचार्यांचा विजय असो!

**भोजनाचार्य** : पण निद्रा गाढ केव्हा लागते? भोजनोत्तर! म्हणूनच भरपूर भोजन करण्यासाठी आम्हाला जगायचं आहे. (खात राहतो.)

**सर्वजण** : भोजनाचार्यांचा विजय असो!

**नृत्याचार्य** : पण भोजनाची आकांक्षा प्रदीप्त होण्यासाठी नृत्याचा व्यायाम करायला पाहिजे. म्हणूनच नृत्य करण्यासाठी आम्हाला जगायचं आहे. (नृत्य करीत राहतो.)

**सर्वजण** : नृत्याचार्यांचा विजय असो.

**सुंदराचार्य** : पण नृत्य करण्यासाठी भिन्न लिंगी जोडीदार पाहिजे. म्हणूनच प्रत्येक पुरुषानं सुंदरांची आराधना केलीच पाहिजे. सुंदरांची मनधरणी करण्यासाठी आम्हाला जगलंच पाहिजे. (सुंदरीची तसबीर घेऊन नाचत राहतो.)

**सर्वजण** : सुंदराचार्यांचा विजय असो!

**सोमाचार्य** : पण सुंदरींची आराधना करण्यासाठी सोमप्राशन केलंच पाहिजे. सोमप्राशन केल्यानंच चित्त सुंदरीवर एकाग्र होतं. सोमप्राशन करण्यासाठी आम्हाला जगायचं आहे.

**सर्वजण** : सोमाचार्यांचा विजय असो!

**द्यूताचार्य** : पण सुंदरा केव्हा मिळते? द्यूतात जिंकल्यानंच सुंदरा मिळते. महाभारताचा संदेश हाच आहे. द्यूत खेळा. सुंदरा मिळवा. द्यूत खेळण्यासाठी आम्हाला जगायचं आहे. (द्यूत खेळत राहतो.)

**सर्वजण** : द्यूताचार्यांचा विजय असो!

**लोकाचार्य** : आणि आपणा सर्वांना आपापल्या इच्छा पुऱ्या करून देऊन आपलं पुढारीपण करण्यासाठी आम्हाला जगायचं आहे.

(हस्तीदंती करीत सर्वांना नमस्कार करीत राहतो.)

**सर्वजण** : लोकाचार्यांचा विजय असो!

**लोकाचार्य** : लोकहो, ऐका. सर्वांना जगायचं आहे. म्हणून मरणमारण करणाऱ्या युद्धाचाऽ

**सर्वजण** : धिक्कार असो!

**लोकाचार्य** : कृष्णशिष्टाई विफल झाली. महाभारतीय युद्ध अटळ झालं. आपण सगळे दुसऱ्यांना मारून मरण्यासाठी इथे जमलो. कौरवांचं सैन्य अकरा अक्षौहिणी. पांडवांचं सैन्य सात अक्षौहिणी. अठरा अक्षौहिणी सैन्य मरून जाणार. एकेक अक्षौहिणी म्हणजे २१,८७० रथ, २१,८७० हत्ती, ६५,६१० घोडे, १,०९,३५ पायदळ सैनिक. अशा अठरा अक्षौहिणी मरणार! सर्वनाश! सत्यानाश!

**सर्वजण** : अरे अरे अरे! वाचवा! काहीतरी करून वाचवा. युद्ध टाळा.

**लोकाचार्य** : तो भगवान श्रीकृष्ण तिकडे युद्ध करण्यासाठी गीता सांगत आहे. मी युद्ध टाळण्याच्या विनंत्या करीत आहे. तो सांख्य आचार्य आहे. मी संख्याचार्य आहे.

**सर्वजण** : लोकाचार्यांचा विजय असो!

**लोकाचार्य** : युद्ध टाळण्यासाठी आपण मला सापडलेल्या नव्या मंत्राचा अवलंब केला पाहिजे. आपण पशुधन कसं मोजतो? पशूंच्या डोक्यांची गणना करतो. ज्यांच्याकडे जास्त पशू तो जास्त धनवान. ज्याच्याकडे जास्त पशू तो जास्त बलवान. त्याचप्रमाणे ज्याच्याकडे जास्त मनुष्यबळ तो अधिक बलवान. तो अधिक श्रेष्ठ. तो विजयी.

**सर्वजण** : लोकाचार्यांचा विजय असो!

**लोकाचार्य** : म्हणूनच कौरवांच्याकडे अकरा लक्ष सैन्य आहे. पांडवांच्याकडे फक्त सात लक्ष सैन्य आहे. मनुष्यजातीचा कौल कौरवांच्याकडेच आहे. सर्व मनुष्ये परमेश्वराचाच अंश नाहीत का? सर्व मनुष्ये सारखीच आहेत! मानवजातीचा कौल मानलाच पाहिजे. क्षुद्र वैयक्तिक कारणासाठी मानवजातीचा संहार करणाऱ्या पांडवांचाऽ

**सर्वजण** : धिक्कार असो!

**लोकाचार्य** : तेव्हा आपण, कौरवांचा विजय झाला अशी द्वाही फिरवू या आणि घरोघर जाऊ या. बोला, कौरवांचाऽ

**सर्वजण** : (टाळ्या वाजवीत) विजय असो!

(इतक्यात आतून क्रोधयुक्त गर्जना ऐकू येते.)

कोण? द्रौपदीच्या अपमानाची विटंबना कोण करते आहे? सूड! सूड! द्रौपदीचा घोर अपमान करणाऱ्या प्रत्येकाच्या नरडीच्या रक्ताचा घोट घेतल्यावाचून हा भीम राहणार नाही. (येत) डोकी मोजून संख्याबळ ठरवतील त्यांची क्षुद्र डोकी माझ्या गदेच्या एकाच प्रहारानं फोडून चूर्ण केल्यावाचून हा भीम स्वस्थ बसणार नाही. आलो! आलो! थांबा! थांबा! सहदेवा, थोडा अग्नी आण. या सर्वांना जाळून भस्म करून टाकतो. (सर्व आचार्य आपापली शस्त्रे, आपापली वस्त्रे टाकून धडपडत पळून जातात. भीम गरागरा गदा आणि डोळे फिरवतो. शेवटी गदा उंच उगारून मध्यभागी आव्हानात्मक भूमिकेत उभा राहतो.)

# बुडत्या बोटीवर

(बोटीचा डेक. मध्यरात्रीची वेळ. बहुतेक प्रवासी झोपेत घोरत लोळत आहेत. कोणी पत्ते खेळत आहेत. कोणी वाचीत आहेत. कोणी दारू पीत आहेत. त्यातच एक झोपाळू, एक तंबाखू खाणारा, एक शिष्ट, एक नट, एक पोलीस अधिकारी, एक पुढारी, एक कारकून, एक शेटजी, एक 'सांस्कृतिक' स्त्री, एक तरुण प्रणयी जोडपे इत्यादी.

इतक्यात कॅप्टन येऊन घंटा वाजवतो.– घण्... घण्... घण्... घण्...)

**एक झोपाळू** : शिंची काय कटकट आहे! जरा कुठे डोळ्याला डोळा लागतो न लागतो, तो हा ठणाणा!

**कॅप्टन** : अहो, पहाट झाली. सर्वांत आधी तुम्ही झोपलात. आता उठा, जागे व्हा नाहीतर...

**झोपाळू** : झालं! आधी घंटेचा ठणाणा आणि आता तोंडाचा ठणाणा! अहो, जरा गप्पा बसायला काय घ्याल? थोडं झोपू द्या!

**कॅप्टन** : अहो आता झोपाल तर कायमचेच झोपाल!

**झोपाळू** : (झोपेतच) आहाहा!

**कॅप्टन** : अहो 'आहाहा' काय? उठा, उठा. (जोरात घंटा वाजवतो.)

**झोपाळू** : छ्या! कोणी मेलं की काय? कॅप्टनसाहेब, ही कुणाच्या मृत्यूची घंटा? तुमच्या?

**कॅप्टन** : तुमच्या! तुमच्या! जागे व्हा नाहीतर मरा!

**झोपाळू** : अहो, मी जागा होईन तर मरीन! इतकी मस्त झोप आलीय! आहाहा!

**कॅप्टन** : (त्याला हलवीत) अहो, उठा लवकर उठा, ही आहे धोक्याची घंटा! अहो, किती झोपाल! जेवणावर हात मारून दुपारी तुम्ही झोपलाच होतात, आणि रात्रीही पुनः झोपलाच आहात डाराडूर. अहो, एवढी झोप येते तरी कशी तुम्हाला? पहाट फुटली म्हणून तरी उठा!

**झोपाळू** : पहाट फुटल्यावर उठायचं? काय सांगता, राव; अहो, पहाट झाल्यावर साखरझोप घेतात! गुलाबी थंडी, गुलाबी झोप,

गुलाबी स्वप्नं! प्रियेऽऽ लाडकेऽऽ...

**कॅप्टन** : अहो, स्वप्नं काय पाहाता? सत्य पाहा! ही आपली बोट...

**झोपाळू** : हृदयेश्वरी, मेरी जान, माय डार्लिंग... (झोपेत, स्वप्नात हसत कॅप्टनच्याच गळ्यात पडतो) आता फक्त एकच, आणखी फक्त एकच...

**कॅप्टन** : एकच लाथ घालतो आता (त्याला ढकलतो.)

**झोपाळू** : (गातो) मार गडे मार पुन्हा धक्का, मी तुझ्या जीवाचा सखा, जीऽऽ

**कॅप्टन** : आता खरंच लाथ घालतो!

**झोपाळू** : दे, हात नाही तर नाही, निदान पाय तरी! मीच चुरीन चरणऽऽ

**कॅप्टन** : (लाथ घालतो.)

**झोपाळू** : (पाय घट्ट धरून) अहाहा, आता पटलं का ते! सुंदरीच्या लाथेनं झाडं मोहरतात, फुलतात, फळतात...

**कॅप्टन** : सोडा, सोडाऽऽ

**झोपाळू** : हाताचा नाहीतर पायाचा...

**कॅप्टन** : (घंटा वाजवीत) मेलो, मेलो, वाचवा, वाचवा, सोडवा, सोडवा.

(एक इसम येतो. कॅप्टनला सोडवतो. झोपाळूला ढकलतो. झोपाळू झोपतो.)

**कॅप्टन** : (घंटा वाजवीत) चांगलं केलंत, धन्यवाद! तुम्ही तरी जागे झालात! आता...

**एक इसम** : मी कधीच झोपत नाही! मी नेहमीच जागा असतो!

**कॅप्टन** : शाब्बास! शाब्बास! तुमच्यासारख्या माणसांचीच आत्ता आवश्यकता आहे! आता तुम्ही...

**एक इसम** : तुम्ही बोला. (बसून चंची काढतो.)

**कॅप्टन** : आता तुम्ही मला सोडवलंत. तसंच आता या बोटीतल्या सगळ्यांना सोडवा. आपण सगळेच एका मोठ्या संकटात सापडलो आहोत.

**एक इसम** : तुम्ही बोला. (तंबाखू मळतो.)

**कॅप्टन** : अहो, हे संकट मोठं आहे. हे संकट भयंकर आहे. हे संकट...

**एक इसम** : अहो, वाइच थांबा, काय संकट, संकट करता, ते राहील उगीच. ते काय पळून जात न्हाय. त्याला सगळ्यांसकट भेटू. मग. आधी...

**कॅप्टन** : आधी उठा, कामाला लागा, नाहीतर...

**एक इसम** : कामं करायची म्हणता ना? मग करायची की. करू खुशाल. आधी... (तंबाखू मळतो.)

**कॅप्टन** : अहो हे फार भीषण संकट आहे, हे संकट पहिलं आणि शेवटचंच ठरेल. हे संकट...

**इसम** : अवं काय लावलंय, राव, संकट संकट? आधी माझ्या संगत ही तंबाखू खा. मग बघा, कामं कशी होतात ते झटझट झटझट (झटझट तंबाखू मळतो.)

**कॅप्टन** : अहो, ही वेळ...

**इसम** : तंबाखू खायची आहे!

**कॅप्टन** : अहो, पण...

**इसम** : प्रत्येक वेळ ही–

**कॅप्टन** : कर्तव्याची–

**इसम** : तंबाखू खायची आहे!

**कॅप्टन** : अहो मग कर्तव्य?

**इसम** : तंबाखू हेच कर्तव्य! आधी तंबाखू खा की कामं झालीच. घ्या, घ्या, घ्या. दिलेलं नाकारू नये. शपथेवर सांगतो, तंबाखू खातो की काम करतो, घ्या, घ्या... (कॅप्टनला तंबाखू देतो. कॅप्टन खाल्ल्याचं सोंग करून फेकून देतो. इसम तंबाखूचा बार भरतो.)

**कॅप्टन** : आता चला, कामाला लागा!

**इसम** : अहो, काय उगाच घाई! माणसं कामाला लागतात का कामं माणसाला लागतात! आँ?

**कॅप्टन** : अहो, मी तुमचं ऐकलं. आता तुम्ही माझं ऐका. ही बोट...

**इसम** : अहो, कामं हुत्याल. कामं काय ऱ्हात्यात? कामं हुत्यातच. सुर्व्या काय उगवायचा ऱ्हायलाय काय? कावं? ऱ्हायलाय का? तो उगवतो. तो चढतो. तो मावळतो. चाललंच हाय. कामं बी चाललीच हायेत.

**कॅप्टन** : अहो, ही बोट बुडत चाललीय!

**इसम** : म्हंजी, चाललीय ना?

**कॅप्टन** : अहो, बुडत चाललीय!

**इसम** : बुडत का होईना, पण चाललीय ना?

**कॅप्टन** : अहो बुडत बुडत!

**इसम** : नाही तर काय उडत उडत? बोट बुडतच चालायची! (तोंड भरले आहे. पिचकाऱ्या मारणे सुरू!)

**कॅप्टन** : अहो, उठा. जरा हातपाय हलवा.

**इसम** : अहो, बसा, जरा घडीभर. तमाखू खावा.

**कॅप्टन** : (रागाने) अहो, उठता की नाही? मरायची वेळ आली तरी उठत नाही?

**इसम** : मरायची वेळ आल्यावर माणसं पडत्यात का उठत्यात?

**कॅप्टन** : हात धरून उठवायला पाहिजे तुम्हाला अन् जुंपलं पाहिजे कामाला. चला! (इसम पिचकाऱ्या मारतो.) कॅप्टन त्याच्या जवळ जातो. इसम पिचकाऱ्या मारीत आहे. कॅप्टनजवळ जाताच त्याच्या अंगावर पिचकाऱ्या मारतो. कॅप्टन पाय दूर करतो. पायातून पिचकारी जाते. मग कॅप्टन मागे सरतो.)

**कॅप्टन** : तुम्ही बसा पिचकाऱ्या मारत. मला तरी माझी कामं करू द्यात.

**इसम** : करा. माझा तुम्हाला तोंड भरून आशीर्वाद आहे!

(कॅप्टन पुनः घंटा वाजवतो)

**एक शिष्ट** : काय कॅप्टनसाहेब, सकाळीच काय काकड आरती सुरू केलीय काय?

**कॅप्टन** : अहो चेष्टा करू नका. खरी गोष्ट पाहा. ही ही आपली बोट– जिच्यावर तुम्ही आम्ही उभे आहोत – ती आणखी अर्ध्या तासानं समुद्राच्या तळाशी जाणार आहे. बोटीच्या तळाशी मोठं भगदाड पडलंय. तुम्ही आम्ही सर्वांनी पाणी बाहेर उपसून टाकलं तरच कसेबसे बंदरापर्यंत पोचू.

**शिष्ट** : समुद्राचं पाणी समुद्रात टाकायचं?

**कॅप्टन** : हो.

**शिष्ट** : तुम्ही कॅप्टन बोटीचे की मिलट्रीचे?

**कॅप्टन** : म्हणजे?

**शिष्ट** : मिलट्रीत शिक्षा देतात, खड्डा खणा आणि भरायला पुनः माती आणा! तसंच सांगताय, समुद्राचं पाणी उपसा आणि पुनः समुद्रात ओता! तुम्ही काय नेव्हीचे कॅप्टन वाटतं? माझा लष्करशाहीला साफ विरोध आहे!

**कॅप्टन** : माझासुद्धा लष्करशाहीला विरोधच आहे हो! पण ही बोट वाचवायची तर मरणाशी युद्धच खेळलं पाहिजे आणि लष्करासारखंच काम केलं पाहिजे.

**शिष्ट** : लष्करशाही येण्यापेक्षा बोट बुडाली तरी चालेल!

**कॅप्टन** : अहो, तुम्ही मराल! जीव वाचवण्यासाठी तरी काम करा.

**शिष्ट** : कामं करून मरण्यापेक्षा कामं न करून मरणंच चांगलं. काम म्हणजे मरणच. करा काम म्हणा राम! छे छे! आम्ही आरामानं जगणार!

**कॅप्टन** : अहो तुम्ही मरणार!

**शिष्ट** : तेही आरामानं! आरामात राम आहे!

**कॅप्टन** : अहो मग कामं कोण करणार?

**शिष्ट** : तुम्ही! तुमची नेमणूक कशाला आहे? तुमचा जन्म कशाला आहे?

**कॅप्टन** : अहो, माझं काम मी केलं, पण अपघात झाला.

**शिष्ट** : अपघात कसला? ती तुमची चूक!

**कॅप्टन** : अहो, असेलही माझी चूक, पण आता ती निस्तरली पाहिजे ना सगळ्यांनी?

**शिष्ट** : आम्ही काय म्हणून निस्तरावी? तुमचीच चौकशी झाली पाहिजे! चौकशी समिती नेमली पाहिजे! मीच चौकशी समितीचा अध्यक्ष! कालपासून भत्ता सुरू! बोटीच्या सर्वांत वरच्या स्पेशल केबिनचं भाडं तिप्पट मिळालं पाहिजे! परतीच्या भाड्याचा भत्ता आगाऊ मिळाला पाहिजे! शिवाय चौकशी समितीला जेवणखाण, चहापाणी वगैरे वगैरे वगैरे फुकट! बोला, देता का टीएडीए?

**कॅप्टन** : अहो, बोट वाचली तर ना टीएडीए?

**शिष्ट** : अहो वेडे, बोट वाचो ना वाचो, तो आमचा प्रश्न नाही. हा प्रश्न समितीच्या कक्षेबाहेरचा आहे. अपघात कोणी केला, एवढाच समितीचा प्रश्न आहे.

**कॅप्टन** : अहो, मी कबूल करतो, मीच अपराध केला. पण आता तरी कामाला लागा.

**शिष्ट** : अहो ही कबुली काय कामाची? तिला समितीची मंजुरी कुठं आहे? आत्ता, तुमची कबुली मार्गदर्शक आहे. त्याबद्दल

समिती तुमचे आभार मानील, पण त्यासाठी समितीला आणखी एक बैठक बोलवावी लागेल. पहिल्या मीटिंगमध्येच पुढली मीटिंग ठरवली पाहिजे. आणि त्यासाठी एक उपसमिती नेमली पाहिजे तिचा भत्ता...

**कॅप्टन** : बोट बुडत चालली आत्ता!

**शिष्ट** : अहो, मीटिंग लांबत चालली. लवकर भरा भत्ता!

**कॅप्टन** : अहो, इथं पाणी येईल आत्ता!

**शिष्ट** : सगळा देश पाण्यात गेला तरी बेहत्तर, पण आत्ताच्या आत्ता मिळाल्याशिवाय भरपूर भत्ता मीटिंगच्या खस्ता आम्ही मुळीच खाणार नाही.

**कॅप्टन** : मग बोट बुडू द्या?

**शिष्ट** : मीटिंगपुढे येऊ द्या.

**कॅप्टन** : ही बोट चालली खाली. आता तुमची मीटिंग 'वर!'

**शिष्ट** : बरोबर! प्रत्येक मीटिंगमध्ये संधान बांधून पुढची मीटिंग घ्यायची– आणखी वर!

**कॅप्टन** : तुम्ही आता वर – संशोधन करा. जा! (कॅप्टन पुनः घंटा वाजवतो.)

**नट** : (एन्ट्री घेत) एन्ट्रीला टाळी पडली पाहिजे. (पोझ घेतो.) अहो कॅप्टनसाहेब, अगदी नाटकाच्या सूत्रधारासारखी घंटा वाजवीत आहात! छान! पण तीन घंटा झाल्या की! खेळ केव्हा सुरू करणार?

**कॅप्टन** : अहो, खेळ खल्लास व्हायची वेळ आली!

**नट** : खेळ खल्लास होईल कसा? शेवटच्या अंकानंतर घंटा होत नाही.

**कॅप्टन** : अहो, तुमच्या आमच्या आयुष्यांतल्या शेवटच्या अंकातला शेवटचा प्रवेश सुरू झालाय!

**नट** : हां, हां, म्हणजे आज खरा खेळ नव्हे, रंगीत तालीम!

**कॅप्टन** : अहो, तालीम नव्हे! जालीम संकट आहे. ही ही आपली बोट बुडू लागलीय.

**नट** : सबंध बोट? सगळ्या सामानासकट? सगळ्या प्रवाशांसकट?

**कॅप्टन** : हो, हो, हो, अगदी तुमच्या आमच्या सकट, सगळ्यासगळ्यां सकट!

**नट** : अहाहा! काय ब्युटिफुल ट्रॅजिडी आहे!

**कॅप्टन** : अहो, या ट्रॅजीडीची कॉमेडी करू शकाल तुम्ही!

**नट** : छे! छे! कॉमेडीपेक्षा ट्रॅजीडीच चांगली! भरपूर गर्दी, भरपूर पैसा.

**कॅप्टन** : अहो, ही बोट आहे आणि ती खाली चालली आहे.

**नट** : म्हणजे हे लिफ्ट स्टेज आहे म्हणा ना! खालीवर होणारं! पण फार सावकाश खाली चाललं आहे. जरा लवकर खाली जायला पाहिजे.

**कॅप्टन** : तुमच्यासारखे प्रवासी असल्यावर लवकरच जाईल!

**नट** : प्रवासी नव्हे. नट म्हणा! कलावंत म्हणा! नायक म्हणा!

**कॅप्टन** : अहो हे नाटक नाही, खरंखुरं जग आहे.

**नट** : सगळं जग म्हणजेच एक नाटक आहे!

**कॅप्टन** : तुम्ही नाटकातले विदूषक दिसता.

**नट** : मी नायक आहे! ना...य...क!

**कॅप्टन** : तुम्ही आयकत नाही खरेच! अहो, जागे व्हा!

**नट** : जागे कसे व्हा? आम्ही स्वतः थोडी घेतो – नाटकासाठी– आम्ही वेगळ्या वातावरणात जातो आणि आपल्याबरोबर सगळ्या जगालाही वेगळ्याच वातावरणात नेतो!

**कॅप्टन** : अगदी खरं! पटलं! तुम्ही सगळ्यांना खरोखरच अगदी वेगळ्याच वातावरणात घेऊन जाणार!

**नट** : मग भैरवी म्हणू? (गाऊ लागतो.)

**कॅप्टन** : तुम्ही आता भैरवीच म्हणा! (कॅप्टन पुनः घंटा वाजवतो.)

**पोलिस अधिकारी** : अहो कॅप्टनसाहेब, काय चालवलंय? माहीत नाही, रात्री अपरात्री घंटा वाजवणं म्हणजे शांततेचा भंग आहे! या गुन्ह्याखाली मी तुम्हाला अटक करू शकेन!

**कॅप्टन** : तुम्ही पोलीस अधिकारी का? फार बरं झालं तुम्ही आलात. तुमचीच गरज होती मला. तुम्हीच आता मदत करू शकाल मला. या लोकांना जागं करा हो.

**पोलिस अधिकारी** : लोकांना जागं कशाला करा? कसे छान शांत झोपलेत! शांतता प्रस्थापित करणं हेच आमचं काम! सर्वत्र आलबेल आहे!

**कॅप्टन** : अहो ही बोट बुडायला लागलीय. लोकांचं रक्षण करणं

हे कर्तव्य आहे तुमचं.

**पोलिस अधिकारी** : तुम्ही आम्हाला कर्तव्य शिकवता काय? तुम्ही कोण? इन्सबॉर्डिनेशन! कायदा आणि सुव्यवस्था यांचं पालन करणं हे आमचं कर्तव्य आहे. सगळे लोक शांत झोपलेत. आमचं कर्तव्य चोख चालू आहे! अगदी आदर्श शांतता नांदते आहे चोहीकडे!

**कॅप्टन** : लवकरच अगदी संपूर्ण शांतता नांदेल इथे! अहो, शांतता नको आहे, चळवळ हवी आहे.

**पोलिस अधिकारी** : तुम्हाला चळवळ हवी आहे? आधी तुम्हाला अटक करून शांत केलं पाहिजे! तुमच्या हाता-पायांत बेड्या ठोकून तुम्हाला तुरुंगात डांबलं पाहिजे!

**कॅप्टन** : अहो मग ही बोट कोण चालवील?

**पोलिस अधिकारी** : मग बोट चालवायची सोडून ही चळवळ कसली चालवली आहेत?

**कॅप्टन** : अहो, पोलिस अधिकारीसाहेब, तुमच्या पाया पडतो, देवाशपथ सांगतो, ही बोट, तुम्ही उभे आहात ती, फुटली आहे आणि बुडते आहे. लवकरच ती रसातळाला जाणार म्हणून घाई करा. सगळ्यांना उठवा, पाणी उपसायला लावा, म्हणजे ती बंदरापर्यंत तरी जाईल.

**पोलिस अधिकारी** : तुम्ही खोटं बोलता. तुम्ही अफवा पसरवता. तुम्ही घबराट उत्पन्न करता. हा गुन्हा आहे!

**कॅप्टन** : अहो ही बोट खरोखरीच बुडणार आहे हो! फक्त अर्ध्या तासात... अवघ्या तीस मिनिटांत...

**पोलिस अधिकारी** : अफवा! साफ अफवा!

**कॅप्टन** : अहो अगदी खरं. अफवा नव्हे हो. कोणत्या शब्दांत सांगू आता?

**पोलिस अधिकारी** : अफवा नव्हे, तर काय पुरावा? बोट कधी बुडते? ही बोट कधी बुडाली होती? आहे पुरावा? अशी घटना कधी घडली होती काय? मग जी गोष्ट आजपर्यंत कधीही घडली नाही ती आत्ताच कशी घडेल?

**कॅप्टन** : चला दाखवतो.

**पोलिस अधिकारी** : मी पाहून काय उपयोग? कोणी साक्षीदार आहे? इतक्या

इसमांशी तुम्ही आत्तापर्यंत बातचीत करीत होतात. कोणी साक्ष देईल काय तुमच्या बाजूनं?

**कॅप्टन** : नाही! पण खऱ्याला साक्ष कशाला?

**पोलिस अधिकारी** : तुमच्यापाशी पुरावा नाही; तुमच्यापाशी साक्ष नाही. कोणत्या कायद्याच्या कोणत्या कलमाच्या कितव्या आकड्यानुसार तुम्ही लोकांची शांतता आणि सुव्यवस्था भंग करू इच्छिता?

**कॅप्टन** : मला माहीत नाही, पण...

**पोलिस अधिकारी** : म्हणजे तुमच्यापाशी कायदापण नाही! मी तुम्हाला अटक करीत आहे. जा आता खडी फोडायला.

**कॅप्टन** : अहो पोलीससाहेब, तुम्हाला मी शरण आलो. मला सोडवा. अहो, मी कॅप्टन आहे हो या बोटीचा. ही बोट बुडते आहे हो. ती वाचवायचा अखेरचा निकराचा प्रयत्न तरी मला करू द्या हो. अहो, मी साधासुधा प्रवासी नव्हे, मी कॅप्टन आहे, कॅप्टन.

**पोलिस अधिकारी** : तोतया! नकली!

**कॅप्टन** : नव्हे. मी असली कॅप्टन आहे हो!

**पोलिस अधिकारी** : मग तुमचं सुकाणू सोडून इथं काय म्हणून आलात मरायला? कामचुकार! गुन्हेगार! संशयास्पद रीतीने भटकता! मी तुम्हाला अटक केली आहे! आता जा अंधारखोलीत!

**कॅप्टन** : मला सोडा हो. नाही तर आपण सगळेच जाऊ अंधारखोलीत.

**पोलिस अधिकारी** : तुम्ही मला अंधारखोलीत धाडणार? (मोठ्याने हसतो.) दाखवतोच आता कोण कुणाला अंधारखोलीत धाडतो ते! चला मुकाट्यानं माझ्याबरोबर.

**कॅप्टन** : (ओरडू लागतो) अहो धावा, धावा. या पोलिस अधिकाऱ्यापासून मला वाचवा! मेलो! मेलो! या पोलिस अधिकाऱ्यापासून आपले जीव वाचवा हो वाचवा.

**पोलिस अधिकारी** : गप गप. ओरडू नको. सोडतो तुला. पण मला काय देशील?

**कॅप्टन** : अहो, मी तुम्हाला तुमचा जीव देईन हो!

**पोलिस अधिकारी** : हे बघ, मला तो जीव नको. मला पैसा हवा. पण तुलाच तुझा जीव हवाय. हवाय ना? मग भर त्याची किंमत.

**कॅप्टन** : अहो, या बोटीवरून मी कुठं पळून जाऊ? मी इथंच आहे. तुम्ही मागाल ते देईन. पण आता मला सोडा.

**पोलिस अधिकारी** : सोडतो पण खबरदार माझ्याशी लबाडी करशील तर! लक्षात ठेव-गुन्हेगार तू. पोलीस अधिकारी मी. मी जातो. पण ती घंटा पुनः वाजवू नकोस.

**कॅप्टन** : अहो मला घंटा वाजवू द्या हो!

**पोलिस अधिकारी** : पुनः तेच?

**कॅप्टन** : मला घंटा वाजवायचं वेड आहे हो!

**पोलिस अधिकारी** : मग मी तुला परवाना देतो! पण त्याची किंमत जादा द्यावी लागेल! लक्षात ठेव! (कॅप्टन पुनः घंटा वाजवतो.)

**एक पुढारी** : (पुढे येत) घंटा तुम्ही वाजवताय होय, कॅप्टनसाहेब? मला वाटलं, आईसफ्रूटची गाडी आली की काय? (हसतो.)

**कॅप्टन** : माझं आता आईसफ्रूट व्हायचीच वेळ आलीय!

**पुढारी** : काय थट्टा करता?

**कॅप्टन** : अहो थट्टा नव्हे. धोक्याची आणिबाणीची घंटा ही!

**पुढारी** : कसला धोका आणि कसली आणिबाणी, कॅप्टनराव?

**कॅप्टन** : अहो ही आपली बोट निम्मी बुडालीय. निम्मी वर उरलीय. तीही लवकरच बुडणार!

**पुढारी** : आता ही थट्टा नव्हे तर काय?

**कॅप्टन** : अहो खरंच थट्टा नव्हे. ही बोट थोड्याच वेळात बुडणार आणि तुम्ही आम्ही मरणार!

**पुढारी** : आता ही थट्टाच नव्हे तर काय? अहो या बोटीतून मी आज प्रथम प्रवास करतोय असं वाटतंय की काय तुम्हाला? पूर्वी या बोटीचा कॅप्टन होता एक मुसलमान मोंगल. मर्जी बिघडली की नोकरांना चाबकाचे फटके मारायचा. बोट काय उगीच चालते? त्यानंतर होता एक गोरा इंग्रज कॅप्टन. तो चाबकानं नाही मारायचा. तो आपला लाथा घालायचा बुटानं. पण कशा, शिस्तीनं! मुसलमान कॅप्टनप्रमाणं कुठंही नाही मारायचा. फक्त

पार्श्वभागावर लाथ घालायचा. त्यामुळे नोकर अगदी खूष असत. आणि बोटही खुषीनं चालायची. छ्या! बोट चालवावी तर मुसलमानांनी नाहीतर इंग्रजांनी. आपली ती कामंच नव्हेत बघा.

**कॅप्टन** : अहो, आता तुम्ही मुसलमानांना नाही तर इंग्रजांना बोलावणार का? पण ते यायच्या आतच ही बोट बुडेल! पण त्यापूर्वीच पाणी उपसाल तर तुम्ही ही बोट वाचवू शकाल! अहो ही बोट तुमचीच आहे. तुम्हीच मालक आहात. मी क्षुद्र नोकर. पण जरा माझं ऐका.

**पुढारी** : नालायका, नोकरशाही देशाचा घात करते ती असा.

**कॅप्टन** : अहो शिव्या द्या, शिक्षा द्या, शिस्तीचे धडे द्या. सगळं सगळं द्या. पण आधी तुमचाच जीव वाचवण्याची संधी मला द्या. माझी कळकळीची विनंती ऐका. हा धोक्याचा इशारा–

**पुढारी** : मीच तुला देतो. मी तुला नोकरीवरून कमी करून टाकणार आणि तुझ्या जागी दुसरा कॅप्टन नेमणार. नाही तरी माझ्या बायकोच्या भावाला काहीही येतच नाही. बोट चालवायला काय लागतंय? ती आपसुक चालतेच अन् किरकोळ कामं दुसरी लोकं करतातच. आपण फक्त बघायचं. काय? तुला तेवढंही जमलं नाही बघ. शेवटचा प्रयत्न कर. बोट चालवलीस तर चांगलं प्रशस्तिपत्रक देईन. नाहीतर रेकॉर्ड खराब करीन. या बोटीचा विजय असो! आता मी निजतो. तू काम कर जा!

(कॅप्टन पुनश्च घंटा वाजवतो.)

**एक कारकून** : (येत) कॅप्टनसाहेब, तुम्ही इतकं जबर भाडं घेता, पण त्याचा मोबदला पुरेपूर देत नाही. काय हा तुमच्या घंटेचा त्रास! देवा रे देवा!

**कॅप्टन** : देवासारखेच आलात तुम्ही. अहो, माझं ऐका, ही आपली बोट बुडायला लागलीय. तुम्ही जरा जनसेवेसाठी श्रमदान कराल तर...

**कारकून** : जनसेवा? आणि ती कशासाठी? जनतेनं आम्हाला काय दिलं आहे?

कॅप्टन : अहो तुम्हाला जीव, नोकरी, बायको, मुलं ही कुणी दिली?

कारकून : जनतेनं आम्हाला घर दिलंय का? कार दिलीय का? पैसाअडका दिलाय का?

कॅप्टन : अहो तो तुम्ही मिळवा की आणि तो मिळवण्यासाठी तरी तुमचा आमचा जीव वाचवा की! चला, जरा हात लावा. ही बोट बुडू लागलीय, आपण पाणी भरू या.

कारकून : घरी रोज पहाटे पाणी भरून भरून माझे हात दुखून गेलेत. मी मुळीच पाणी भरणार नाही. मी पाणीदार आहे!

कॅप्टन : अहो, नाही तर ही बोट बुडेल.

कारकून : मग? मी काय पाणक्या आहे? मी कारकून आहे! काय समजलात तुम्ही? माझा जीवनस्तर उच्च आहे!

कॅप्टन : अहो ही बोट नीच स्तरात बुडेल. मग काय तुमच्या उच्च जीवनाचं?

कारकून : मी जीवनविमा उतरलाय पंचवीस हजारांचा! चार मुलं आणि एक बायको. प्रत्येकाला पाच हजार मिळतील!

कॅप्टन : कुठं आहेत तुमची बायकामुलं?

कारकून : इथंच. थर्डक्लासमध्ये.

कॅप्टन : अहो, मग ही बोट बुडाली तर तीही नाही का बुडायची?

कारकून : माझं कर्तव्य मी केलंय! आता त्यांचं नशीब.

कॅप्टन : अहो त्यांचं नशीब तुमच्या हातांत आहे हो! जरा पाणी भरा!

कारकून : पाणी भरायला मी काय बांगड्या भरल्या आहेत?

कॅप्टन : नाही, म्हणूनच जरा पाणी भरा–

कारकून : (हसत) कॅप्टनसाहेब, पाणी भरायला गवळणी बोलवा आणि तुम्ही कृष्ण व्हा!

कॅप्टन : अहो, कृष्णानं गोवर्धनपर्वत उद्धारला तो सर्व गोपगोपींच्या साह्यानं. तुम्ही सर्वजण मला साह्य कराल तर मी ही आपली बुडणारी बोट उद्धारू शकेन हो!

कारकून : अहो कृष्ण न् त्याचे सवंगडी दूध, तूप, दही, लोणी खात होते. आम्ही खातो रेशन आणि भेसळ. आमच्यानं

काय होणार? कुठे कृष्ण आणि कुठे तुम्ही कॅप्टन! छी! छी! छी!

**कीर्तनकार** : (पुढे येत) हरेराम हरेराम हरेकृष्ण हरे हरे! कृष्णनामाचा जप केलात! छान! भगवान श्रीकृष्ण तुम्हाला यश देईल! जपा, हरे राम हरे राम...

**कॅप्टन** : (कपाळावर हात मारीत) हरे राम! हरे राम!!...

**कीर्तनकार** : कृष्ण कृष्ण हरे हरे!

**कॅप्टन** : अहो बुवा, तुम्ही तरी जरा लक्ष द्या बुवा. अहो ही आपली बोट पाताळात चाललीय. जरा कृष्णाचं नाव घेऊन सर्वांना पाणी उपसायचं आवाहन करा हो. कृष्णाचा जप करता करता सगळं पाणी तेव्हाच उपसून होईल.

**कीर्तनकार** : म्हणा, हरे राम हरे राम कृष्ण कृष्ण हरे हरे!

**कॅप्टन** : अहो नुसता जप नव्हे, पाणी उपसा पाणी.

**कीर्तनकार** : हरे राम हरे राम कृष्ण कृष्ण हरे हरे!

**कॅप्टन** : अहो बुवा, बोट बुडाली!

**कीर्तनकार** : क्षुद्र बोटीची काय काळजी करता? ज्यानं ही बोट निर्माण केली त्यालाच तिची काळजी! कर्ता करविता तो! तोच सर्वांना तारणार! त्याची काळजी करा! म्हणा– हरे राम हरे राम कृष्ण कृष्ण हरे हरे!

**कॅप्टन** : अरेरे! बुवा, बोट थोडीच राहिली!

**कीर्तनकार** : अहो, जेहेत्ते कालाचे ठायी संपूर्ण पृथ्वी प्रत्यक्ष पाताळात गेली होती. तेव्हा प्रत्यक्ष भगवंतांनी वराह अवतार धारण केला. आणि प्रत्यक्ष दातांत धरून पृथ्वीचा उद्धार केला! म्हणा, हरे राम हरे राम कृष्ण कृष्ण हरे हरे! वराह अवतार निश्चित येणार! देवा वराहा!

**शेटजी** : (कॅप्टनला हळूच) कॅप्टनजी, ही बोट बुडते काय?

**कॅप्टन** : होय हो शेटजी, जयगोपाळ.

**शेटजी** : म्हणजे बोटीचा दिवाळा निघते?

**कॅप्टन** : होय हो शेटजी.

**शेटजी** : अरे हे तो चांगला होते. आमी समदा बोट खरेदी करते.

**कॅप्टन** : शेटजी, बोट बुडते!

**शेटजी** : म्हणजे भाव पडते!

**कॅप्टन** : शेटजी, बोट पार बुडणार!

**शेटजी** : म्हणजे, भाव पार पडणार! मग घणो नफा होऊ छे! घणो नफा! बुडू दे! लवकर बुडू दे ही बोट!

**कॅप्टन** : अहो, ही बोट बुडाल्यावर तुम्ही नाही का बुडणार? त्याऐवजी मला पाणी काढायला मदत केलीत तर तुम्ही वाचाल, बोटपण वाचेल.

**शेटजी** : अरे बोट न बुडून कसा चालेल? बोट तर बुडलीच पाहिजे! मगच घणो नफा!

**कॅप्टन** : अहो पण तुम्ही नाही का बुडणार?

**शेटजी** : अरे, बेपारमंदी गोष्टी पाहिजे. एक धाडसने, दुसरी नशीब. मी धाडस करते आणि माझा नशीब बळकट असते. मी फक्त एक लोटा घेऊन मारवाडातून आले तर आज लोट्यानं पैसा मोजते. हा माझा नशीब. सगळा बाजार मंदीनं बुडाला पण मी नाही बुडले. तसीच समदी बोट बुडाली तरी मी नाही बुडते. अरे काही टेबल, खुर्ची, कपाट तरंगेल व त्याच्यावर मी बसेल व तेच घेऊन विकेल.

**कॅप्टन** : शेटजी, या बोटीत सुटं लाकडी सामान काही नाही आहे. सगळ पक्कं बंदिस्त आहे. बुडाली तर तुमच्यासकट सगळी बुडेल.

**शेटजी** : अरे छोड. बेपारमंदी मी समद्या व्यापाऱ्यांच्या उरावर बसते. बुडून जे कुणी फुगून वर येतील त्यांच्या उरावर मी बसेन. तोवर मी तग धरू शकते. बुडू दे! बालाजी, ही बोट जलदी बुडू दे, मी तुझ्यासाठी एक मोठा मंदिर बांधीन माझ्या नावानं!

**कॅप्टन** : तुमचा बालाजी तुम्हाला लाभणारच! (घंटा वाजवतो.)

**शेटजी** : अरे, तू घंटा वाजवते, चांगला करते, आमचा देव जागा होते. आम्हाला प्रसन्न होते. वाजव. जोरसे घंटा वाजव. (कॅप्टन घंटा वाजवतो)

**एक स्त्री** : ही कसली मेली घंटा या भलत्या वेळी?

**कॅप्टन** : सगळ्या लोकांनी जागं व्हावं म्हणून आहे ही घंटा.

**स्त्री** : अय्या, कॅप्टनसाहेब, म्हंजे तुम्हाला जनजागृती का

करायची आहे? मला नाही का सांगायचं मग? अहो, जनजागृती, जनसेवा ही तर माझी एकमेव हॉबी आहे. आणि मी माझ्या बंगल्यांतून, माझ्या गाड्यांतून ती फुकट करते हो!

**कॅप्टन** : चांगलं झालं तुम्ही भेटलात, आपण या सगळ्यांना जागं करू या, आणि या बुडत्या बोटीतलं पाणी उपसून टाकू या.

**स्त्री** : इश्श! पाणी उपसायचं ही कसली मेली समाजसेवा? स्त्रियांनी काय नुसतं पाणीच भरायचं जन्मभर? मी नाही करायची ही बोटभरही सेवा. शी! समाजसेवा कशी पाहिजे कुटुंबनियोजनासारखी.

**कॅप्टन** : अहो पण कुटुंबनियोजनाचा इथं काय संबंध? ही बोट इकडे बुडायला आलीय.

**स्त्री** : का बरं? कुटुंबनियोजन या सगळ्या प्रवाशांनी आणि त्यांच्या आईबापांनीसुद्धा केलं असतं तर ही समस्या उद्भवली असती का? तुम्हीच सांगा बरे.

**कॅप्टन** : अहो, पण आधी पाणी काढलं पाहिजे आता.

**स्त्री** : छे, छे, आधी कुटुंबनियोजन केलं पाहिजे. तुम्ही करता का?

**कॅप्टन** : अहो ते नंतर करू हो. तुमच्या पायाखाली आता काय आहे ते पहा. पाणी! पाणी! पाणी! ते आधी काढलं पाहिजे.

**स्त्री** : पाणी काढायचं एवढंच ना? हात्तिच्या! त्यासाठी कामगार लावू या की! कामगार हवे तितके पाण्यातच चाललेत की! आणि एक सांस्कृतिक कार्यक्रम करू की त्यांचा खर्च देऊन वर जंगी पार्टी करू! मी खूप बसविलेत सांस्कृतिक कार्यक्रम. अगदी मॉडर्न स्टाईलचे! करून दाखवू?

**कॅप्टन** : या बुडत्या बोटीवर!

**स्त्री** : उडत्या विमानातसुद्धा केलेत मी! हवाई सुंदरी होते मी! म्हणजे सुंदरी अजून आहेच मी; फक्त हवाई गेलीय. मी सांस्कृतिक कार्यक्रम करतेच. मग पाहाच कसा बोटीचा

उद्धार होतो ते.

**कॅप्टन** : तुमच्या या सांस्कृतिक कार्यक्रमानं खरोखरच बोटीचा उद्धार होणार अगदी स्वर्गापर्यंत!

**स्त्री** : (मुरकून) मला म्हणतातच मुळी अप्सरा! तुम्ही मुळीच काळजी करू नका. मला सगळा अनुभव आहे! मी सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी करते हं. काल इतकी सुंदर इंपोर्टेड स्मगल्ड साडी मी मिळवली आहे! सगळ्या बायका जळतील अन् सगळे बापडे लट्टू होतील. मग समाजसेवेला कसला उशीर? तुम्ही घंटा वाजवा – आणि प्रेक्षक जमवा. पुढचं काम माझं. मी आलेच हं मँचिंग करून (जाते.)

**कॅप्टन** : जा मॅचिंग करा. समुद्राच्या पाण्याशी मॅचिंग करा आता. (घंटा जोरजोरात वाजवतो. एक तरुण जोडपे रमत गमत जवळ येते.)

**तो** : तुझ्या सहवासात या घंटेचा आवाज म्हणजे मंगलवाद्यांचा निनादच वाटतोय.

**ती** : आपली लग्नाची तिथी अजून चांगली दूर आहे म्हटलं.

**तो** : पण मला हीच मंगलघटिका वाटतेय.

**कॅप्टन** : माफ करा; ही मंगलघटिका नाही, दंगलघटिका आहे. हे बोहलं नाही. ही बुडती बोट आहे. या बोटीची घटिका भरली आहे! तुम्ही बोहल्यावर चढत नाही आहात. बुडत्या बोटीबरोबर तुम्ही खाली जात आहात.

**तो** : नाही, नाही, मी हे होऊ देणार नाही. मी हिला वाचवल्याशिवाय राहणार नाही. कॅप्टनसाहेब, छोटी होडी खाली सोडा आणि हिला दूरदूर घेऊन जा.

**ती** : आणि तू?

**तो** : तुझ्या प्रीतीच्या स्फूर्तीनं या बोटीतील जितक्या जणांना वाचवता येईल तितक्या जणांना वाचवण्याचा प्रयत्न करीन.

**ती** : आणि मी तुला सोडून जाऊ? तुझ्याबरोबर मीही काम करीन. मीही इतरांना वाचवीन.

**तो** : हे तुझं काम नव्हे. माझ्या राजहंसे, तुला स्वतःला तरी

पोहता येतंय का? गायन करणं, नृत्य करणं, हे तुझं काम. जा, आपल्या कला वाचव. आपल्या कला वाढव. कॅप्टनसाहेब, हिला घेऊन जा हो.

**ती** : तुझ्यावाचून या कला कुणाला दाखवू?

**तो** : चित्रित करून ठेव. ध्वनिमुद्रित करून ठेव. पुढे कुणीतरी रसिक येईल त्याच्यासाठी ठेव तो ठेवा.

**ती** : माझी कला हा तुझाच ठेवा आहे. अरे राजा, तुझ्याविना मी जगणारही नाही तर कला कुठून करणार?

**तो** : कॅप्टनसाहेब, हिचं ऐकू नका. हिला घेऊन जा.

**ती** : खरंच का तुला सोडून जावं लागेल? नको. नको. तुला सोडून जाण्याऐवजी दुसरं काहीही करायला सांग. तुला मी क्षणभरसुद्धा सोडणार नाही.

**तो** : कॅप्टनसाहेब, घेऊन जा हिला.

**ती** : सख्या, तुझ्या कायमच्या विरहाच्या कल्पनेनंच मला तुझ्या प्रीतीचा साक्षात्कार झाला. मी धन्य झाले. आता मला काही काही नको. फक्त हवा आहेस तू.

**तो** : नाही, कॅप्टनसाहेब हिला घेऊन जा.

**कॅप्टन** : मित्रांनो, ही बोट सोडून मी जाऊ शकत नाही. बोट बुडून मीही बुडेपर्यंत मला माझं कर्तव्य केलंच पाहिजे. घंटा वाजवणं आणि लोकांना जागं करणं हेच माझं कर्तव्य. तेच मी अखेरपर्यंत करीत राहणार.

**ती** : आज मी जागी झाले. इतके दिवस झोपेत होते. आज माझ्या जीवनात पहाट झाली. सख्या, तूच माझा जीवनसूर्य.

**तो** : मी कसला जीवनसूर्य? हे जीवन तुझा घास घेत आहे. त्यातून मी तुला वाचवू शकत नाही.

**ती** : कशाला वाचायचं? हेच आपलं जीवन! मी कोण आहे हे समजलं. तुझा हात मी हातांत धरला तो सोडण्यासाठी नाही. असाच तो माझ्या हातांत राहू दे.

**तो** : सोड मला. मला माझ्या कामाला जाऊ दे. ही बोट वाचवली पाहिजे. या बोटीतली मुलं, बायका, माणसं, सामान सगळं वाचवलं पाहिजे. कॅप्टनसाहेब, चला...

**ती** : माझ्या जीवाऽ...

**कॅप्टन** : काही उपयोग नाही आता! या बोटीची घटका खरोखरीच पूर्ण भरली. लवकरच ती बुडणार.

**तो** : मग ही घंटा कशाला वाजवता? लोक काय करताहेत?

**कॅप्टन** : मी दमलो. घंटा वाजवून वाजवून दमलो. ओरडून ओरडून दमलो. पण कुणीच माझं ऐकेना. पण मला घंटा वाजवलीच पाहिजे. माझा हात तुटला तरी घंटेचा नाद नाही तुटता कामा.

**तो** : काय हे लोक आणि काय हे जीवन!

(लोक अस्ताव्यस्त झोपले आहेत. पसरले आहेत. दारू पीत आहेत. कोणी खात आहेत. कोणी ओकत आहेत. कोणी पैसे खेळत आहेत. कोणी शृंगारिक पुस्तके वाचीत आहेत.)

**कॅप्टन** : हेच जीवन! हेच जीवन!!

**ती** : अहो, खरोखरच जीवन! हे पाहा पाणी लागलं. घंटा वाजतेच आहे!

**कॅप्टन** : माझं कर्तव्य मी केलं. आता मी सुखानं मरतो. (सावधान उभा राहतो.)

**ती** : ('त्या'चा हात धरीत) मी खरी प्रीती करू शकले. मी प्रीतिसमाधी घेते. ये राजाऽ

**तो** : खरंच, ही जलसमाधी नव्हे. ही प्रीतिसमाधी! ये!

(जवळ जवळ उभे राहतात. मोठी लाट आदळल्याचा, सामानाची पडझड झाल्याचा, लोकांच्या ओरडण्याचा, संमिश्र आवाज...)

**झोपेत एकजण** : पाणी आलं, पाणी आलं...

**झोपेत दुसरा** : चला, चला रांगा लावा, बादल्या भरा, आमचा नंबर पहिला!

(बोटीवर दुसरी लाट आदळते. सर्वांना धक्का बसतो. मागे थोडे पाणी उडताना दिसते. थोडा शिडकावा वर येतो.)

**झोपाळू** : अहो, पाण्याचा पूर आला! मुंबई महानगरपालिकेचा पाईप पुनः फुटला वाटतं? (तिसऱ्या लाटेचा आवाज व शिडकावा. आता मात्र सर्व जण जागे होतात. घाबरतात.)

**एक इसम** : (पाण्यात तंबाखूच्या पिचकाऱ्या मारतो) हे हे पाणी गेलं चुलीत. हे पाणी गेलं मसणात. हे पाणी गेलं नरकात. हे पाणी गेलं ह्याच्यात. हे पाणी गेलं त्याच्यात. हे पाणी गेलं... (फक्त शिव्या देतो.)

**शिष्ट** : कुठं गेला तो महामूर्ख कॅप्टन? आम्हाला योग्यवेळी योग्य शब्दांत योग्य नोटीस दिली असती तर आम्ही ही समस्या चुटकीसरशी सोडविली नसती? मूर्ख कॅप्टन...

**नट** : कॅप्टनसाहेब, तुम्ही डायरेक्शन नीट का दिली नाहीत? तुमची डायरेक्शन चुकली आणि आमचा खेळ बुडाला! भिक्कार डायरेक्शन! धिक्कार असो तुमचा! धिक्कार!

**पोलिस** : कॅप्टनसाहेब, उभे काय राहिलात चौकातल्या पोलिसासारखे? मरणाचा मार्ग दाखवीत? कडक वॉर्निंग का दिली नाहीत?

**पुढारी** : कॅप्टनराव, आम्हाला एक अक्कल नव्हती. पण तुम्हाला? एक लाथ का नाही घातलीत आम्हांला? आम्हांला काय लाथा खायला पार्श्वभाग नव्हते की थोबाडीत खायला गाल नव्हते? मग काय उपयोग आमच्या गालांचा आणि पार्श्वभागांचा? का नाही भडकावल्यात थोबाडीत आमच्या? का? का? का?

**कारकून** : अहो मी विम्याचा शेवटचा हप्तासुद्धा वेळेवर भरलाय हो! माझ्या कुटुंबाची सगळी काळजी घेतलीय मी. फक्त एकाला म्हणजे मला – कॅप्टनसाहेब, आता तुम्हीच माझे साहेब, तुमचेच पाय धरतो, वाचवा हो! मला पोहता येत नाही हो. कुणी शिकवलंच नाही आम्हाला. आणि मला पहिल्यापासूनच पाण्याची भीती वाटते हो! पाणी पितानासुद्धा मी घाबरतो. पण कॅप्टनसाहेबांना बोट चालवण्याआधी पोहायला शिकवत असणारच! नाही का साहेब? साहेबसाहेब, मी तुमचे पाय धरतो, मी तुम्हाला जन्मभर भाजी आणून देतो, मी जन्मभर तुम्हाला सलाम ठोकतो, मला एकट्याला वाचवा हो! साहेबरावजी, जन्मभर पै पैसे वाचवून खाल्ल्यानं माझं वजन सर्वांत कमी आहे हो! लोकांचे काय, मी माझेसुद्धा

पैसे खात नव्हतो हो! तसं माझं वजन सर्वच बाबतींत अगदीच कमी आहे हो. कॅप्टनसाहेब, मी अगदी हलका आहे हो, अगदी हलकट म्हणाना. माझा जीव तो केवढासा? अगदी छोटा! तुम्हाला तर मुळीच जड होणार नाही! वाचवा हो, मला एकट्यालाच वाचवा होऽ

**कीर्तनकार** : नौकाप्रभू कॅप्टनसाहेब, तुम्हीच माझे देव आहात, तुम्हीच माझे महादेव आहात, तुम्हीच माझे देवाधिदेव आहात! तुम्हीच वराह अवतार आहात, नाही म्हणजे चांगल्या अर्थानं हो. वराह नाही म्हणत, कृष्ण म्हणतो! भगवान श्रीकृष्ण! संभवामि युगे युगे! तुम्हीच मला अर्जुनाप्रमाणे वाचवणार. तुमचाच प्रियभक्त आहे हो मी. अनन्यशिष्य एकशरण आहे हो मी तुमचा! बुडत्या जगाला तारणाऱ्या या महान जगद्‌गुरूला तारा! मी तुम्हाला आशीर्वाद देईन. मला वाचवा. अहो, वाचवा.

(कॅप्टन शांत उभा. सर्व लोक त्याच्या भोवती. शेटजी लोकांचे सामान गोळा करतो. मग त्यांच्या खिशांत हात घालून त्यांचे पैसे चोरतो. पैसे मोजतो. इतक्यात पाण्याचा मोठा हबकारा तोंडावर बसून शेवटी कासावीस होतो. थोड्या वेळाने)

**शेटजी** : अरे, हा तो घोटाळा झाला. जगाची मंदी म्हणजे आमची संधी पण आधी आमच्याच जीव धोक्यामंदी आला. हे कसा झाला? साला हा सारा काळच कामवाल्यांचा आला. कामवाल्यांआधी भांडवलवाल्यांचं मरण? अरे, हा असा कसा झाला? आधी समद्या कामवाल्यांना बुडवला पाहिजे. समद्या प्रतिस्पर्ध्यांना बुडवला पाहिजे. समदी दुनिया बुडाली पाहिजे. पण आता मीच बुडालो. नाही, नाही, समदी दुनिया बुडाली पाहिजे. पण मी नाही डुबते मी नाही डुबते – मी समद्यांना डुबवते पण मी नाहीच डुबते. (पाण्याच्या लाटेने आडवा पडतो)

**स्त्री** : कॅप्टन, कॅऽप्टऽन अहो सुरू होण्यापूर्वीच सगळा सांस्कृतिक कार्यक्रम संपला की हो! कॅप्टनसाहेब, तरी तुम्ही स्वस्थ कसे? लोक जाऊ देत खड्ड्यात. लवकरच

जातीलच अगदी खड्ड्यात. मग त्यांच्या बोलण्याला काय किंमत? हे बोलणंही बुडूनच जाईल की. कॅप्टन, तुम्ही उडी मारा गडे आणि मला लिफ्ट द्या ना. मला घेऊन चला घरी माझ्या किंवा तुमच्या. चला, चला ना. लवकर चला ना गडेऽ...

(संमिश्र आवाज वाढत जातात. सर्व जण इकडून तिकडे धावतात, धडपडतात, गडबडतात, शिव्या देतात, ओरडतात, रडतात. देवाला हाका मारतात. जगाला नावे ठेवतात, कुणी स्वतःच्या कपाळावर मारतात. कुणी कॅप्टनला मारतात. कुणाची धोतरे, कुणाच्या पँटस्, कुणाचे केसाचे टोप, कुणाच्या कवळ्या, स्त्रीचा हेअर डू... गळून 'मेलो, मेलो, वाचवा, वाचवा, धावा, धावा' असा हलकल्लोळ होतो. मध्यभागी कॅप्टन पुतळ्याप्रमाणे घंटा वाजवीत स्थिर. जवळच हातांत हात घालून प्रेमी जोडपे शांत हसत उभे. हळूहळू असे हे दृश्य खालून वर अदृश्य होत जाते!)

# अपघात

(विख्यात इंग्रजी नाटककार जे. ब्री. प्रीस्टले यांच्या 'डेंजरस कॉर्नर' या नाटकातील नाट्यतंत्रास अनुसरून लिहिलेली नाटिका.)

(वसंत, माधव यांचे हसणे ऐकू येत असतानाच घड्याळात नऊ वाजल्याचे ठोके पडतात.)

**माधव** : वसंता, तूही पण कमाल केलीस हं!

**वसंत** : अरे माधव, मी कामं केलेली आहेत कॉलेजच्या नाटकांतून.

**मीना** : ही काय थट्टेची रीत झाली? हं!

**वसंत** : अग थट्टेला कसली रीत, मीना? पुष्कळदा खोट्या गोष्टींनीच अशी मजा आणायची असते. मी कॉलेजात होतो तेव्हा तासाला कंटाळा आला की उगीचच शंका उकरून काढून तास घालवीत असे.

**माधव** : वहिनी, पण फसलात की नाही?

**मीना** : आम्हा बायकांची मनं खरंच तुमच्यापेक्षा जास्त हळवी. कोणतीही स्त्री फसली असती.

**माधव** : ते काही नाही. आम्हांला पेनल्टी पाहिजे, पाहिजे, पाहिजेऽ.

**श्रीपाद** : (भारतीला घेऊन येत) अरे अरे, काय चाललंय काय?

**वसंत** : या या टीकाशास्त्री श्रीपाद.

**श्रीपाद** : भारती –

**भारती** : नमस्ते.

**मीना** : (लहान मुलीशी बोलण्याच्या स्वरात) ओहो! भारतीपण का? छान! नानांशिवाय करमत नाही वाटतं?

**श्रीपाद** : (हसत) मलाच तिच्याशिवाय करमत नाही. एवढीशी चिमणीसारखी आहे पण – माझीच मुलगी म्हणून म्हणतो असं नाही. तुम्ही पहालच, फारच समजूतदार आहे. रडणं नाही की कधी कुणाशी भांडण नाही.

**वसंत** : हो का ग भारती?

**मीना** : अय्या, कित्ती गोड लाजते हो!

**श्रीपाद** : आतादेखील ती आपली पत्त्यांचे बंगले करीत बसेल आणि कंटाळली

की जाईल झोपी मुकाट्यानं.

**माधव** : काय ग, तुझे नाना तुला हाक कशी मारतात? भारे, भारती की नुसतंच रती?

(सर्वजण हसतात.)

**मीना** : काय भारती, आम्हांला छानसं गाणं म्हणून दाखवणार नं? अं?

**भारती** : मी नाहीऽ.

**श्रीपाद** : आत्ता लाजली आहे ती. म्हणेल मग जरा वेळानं. हो ना रे राजा? हो...

**माधव** : वहिनी, आपला मूळ मुद्दा बाजूला राहतोय हं.

**श्रीपाद** : अरे हो खरंच, काय पाहिजे होतं कोणाला?

**माधव** : अरे श्रीपाद, तूच पाहिजे होतास. पण हे बघ, उगीच कसली मीमांसा करीत बसणार नसशील तरच. आता आम्ही – म्हणजे वसंतानं आणि मी– एक नाटक केलं. पैशावरून भांडणाचं! आणि वहिनींना हातोहात फसवलं बघ. त्यांच्या डोळ्यांतनं पाणी आलं तेव्हा थांबवलं!

**श्रीपाद** : छान!

**माधव** : तर आता प्रश्न असा – वहिनींनी पेनल्टी द्यायला पाहिजे की नाही? थोडक्यात सांग. मीमांसा नको.

**श्रीपाद** : वाः! म्हणजेच काय? पाहिजेच! (सर्व पुरुष हसतात.) वहिनी, मी सांगतो तुम्हाला पेनल्टी. तुमचा सतारवादनाचा कार्यक्रम आहे ना रेडिओवर? 'लिसनर' मध्ये वाचलं बरं का आम्ही. मग तुम्ही आम्हांला आज खूप वेळ सतार ऐकवायची!

**माधव** : सुरेख, सुरेख. श्रीपाद, तुझ्या त्या टीका आणि मीमांसा मी आदरानं दुरूनच बघत असलो तरी तुझी ही टीका मात्र आपल्याला एकदम पसंत पडली बुवा! (हसतो.)

**मीना** : बरं. येते मी सतार घेऊन. (जाते.)

**श्रीपाद** : कित्येक वेळा असं वाटतं की इंग्रजी चालीरीती पुष्कळ चांगल्या. आता हेच पाहा ना. वसंत, आपण जर इंग्लंडमध्ये असतो ना, तर प्रत्येकवेळी तुझ्या घरी येताक्षणीच तुझं अभिनंदन केलं असतं मी...

**माधव** : अशी बायको मिळवल्याबद्दल ना?

**श्रीपाद** : अर्थात! अरे कॉलेज गाजत होतं तिच्यामुळं! कितीतरी गद्यप्रकृती

विद्यार्थ्यांनाही तिच्यावर पद्य करायची स्फूर्ती होत असे. पण अरविंदाच्या कवितेची सर कोणालाच आली नाही.

**वसंत** : काय, अरविंदानं तिच्यावर कविता...?

**श्रीपाद** : वसंता, सांभाळून हं! कविता करायला काही बंदी नाही. इतरांनी केल्या. अरविंदानंही केली. मला म्हणून त्यानं कवितेची नायिका कोण ते सांगितलं. पण यापेक्षा जास्त तो कधीच काही म्हणाला नाही. आणि आणखी काही असेलसं मलाही वाटत नाही.

(मीना येते.)

**माधव** : वाः! वहिनी, तुमच्या हातात सतार म्हणजे – मी पडलो बिझिनेसमन, मला काय वर्णन करता येणार एखाद्या कवीसारखं – पण अगदी शोभून दिसते हं.

**श्रीपाद** : सतारवादनानं मला नेहमी प्रमत्त मयूराच्या नृत्याचीच आठवण होते. सरस्वतीचं वाहन मोर करण्यात आणि तिच्या हातांत सतार देण्यात केवढी कल्पकता दाखवली आहे आपल्या पूर्वजांनी!

**वसंत** : काय ग आज तुझा आवडता शंकरा आधी वाजवणार की माझा मालकंस?

**मीना** : आधी तारा तर लावून घेते.

**सर्वजण** : हो, हो, ते खरंच.

(शांतता. मीना तारा लावू लागते. तारा लावून थोडे वाजवते, श्रीपाद 'सुरेख' म्हणतो, त्याचक्षणी मुख्य तार तुटते.)

**मीना** : अगबाई! तार तुटली! आता हो काय करायचं?

**श्रीपाद** : अहो वहिनी, एवढं भ्यायला काय झालं?

**माधव** : नाही तर काय?

**वसंत** : भारी भित्री बुवा!

**मीना** : मला बाई कसंसंच वाटतं. असं व्हायला नको होतं यावेळी.

**माधव** : दुसरी तार लावा. त्यात काय?

**मीना** : दुसरी तार नाही घरात.

**श्रीपाद** : मग आणतो पाहिजे तर आत्ता जाऊन.

**माधव** : इतक्या रात्री कुठलं दुकान उघडं असणार?

**श्रीपाद** : अहो पण वहिनी, एवढं मनाला धसका लागण्याजोगं काय झालं? साधी तार तर तुटली. तुमचा कार्यक्रम काय उद्या होईल!

**वसंत** : एवढी शिकली पण शकुन अपशकुनावरचा विश्वास काही उडाला

नाही.

**मीना** : शकुन अपशकून राहू दे हो. पण माझ्या मनात एकदम धस्स झालं.

**माधव** : वहिनी, राहू द्या ती सतार. आज नुसत्या गप्पाच मारू. किती दिवसांनी भेटतो आहोत आपण सगळे एके ठिकाणी!

**श्रीपाद** : खरंच मागे आपण भेटलो होतो त्याला आता वर्ष होईल, नाही? त्या वेळी अरविंद होता आपल्यात. काय दैवाचा योग पहा, बिचारा विहिरीत बुडून मेला. तो असायला हवा होता आज. मजा आली असती.

**वसंत** : श्रीपाद, तुम्हा टीकाकारांना काहीही वाटो, पण माझ्यासारख्या उद्योगप्रिय मनुष्याला त्याच्यासारख्या कवींच्या त्या विलक्षण नैराश्याच्या कविता मुळीच आवडत नाहीत. दुबळ्या माणसांना त्या आवडतात आणि ती दुबळी माणसं त्यानं अधिकच दुबळी बनतात, असं माझं स्पष्ट मत आहे.

**श्रीपाद** : अरविंदाच्या कवितांवर मी एक प्रबंध लिहायला घेतलाच आहे. त्यात याच मुद्याचा मी अगदी सांगोपांग विचार केला आहे.

**माधव** : थांब, थांब. मीमांसा नको. तुमच्या त्या मीमांसा मासिकांना भारदस्तपणा आणण्यासाठी आणि विद्यार्थ्यांवर छाप पाडण्यासाठी असतात, असं माझं स्पष्ट मत आहे.

**श्रीपाद** : माधव, तुला शपथेवर सांगतो, आज इथे मी कसलीही मीमांसा करणार नाही. झालं?

**माधव** : श्रीपाद, रागावू नकोस बुवा.

**श्रीपाद** : छे छे. तुझं म्हणणंही खोटं नाही. आज आपण जमलो आहोत करमणूक करायला, चर्चेला नाही. पण अरविंदा इथं असता तर मजा आली असती असंच मला वाटतं. हीच त्याची गंमत होती. तो कित्येकदा अगदी नैराश्यपूर्ण कविता करायचा तर कधी अगदी विनोदी! काय वहिनी, आपल्या कॉलेजच्या सहलीच्या वेळी त्यानं केलेल्या विनोदी कविता आठवतात ना तुम्हाला?

**मीना** : हो, पण पुष्कळदा ते निराशच दिसत हेही खोटं नाही.

**श्रीपाद** : अहो, ही अमर्याद – आपल्या शब्दांत सांगायचं म्हणजे अवास्तव– आकांक्षा करणारी माणसं. त्यामुळं त्यांची मनं बहुधा हुरहुरीनंच भरलेली. बरं. ते जाऊ दे. त्याची आठवण बुजणार नाही, हे मात्र खरं. अरे खरंच, लवकरच एका नव्या लेखकाचं नाटक रंगभूमीवर

येणार आहे. त्याचं नाव काय माहीत आहे? 'खरं खोटं देव जाणे!' त्याची माझी ओळख म्हणून चार पास मिळविलेत मी आपल्याकरिता!

**सर्वजण** : छान! छान!

**मीना** : श्रीपाद्भाऊजी, हे खरंच छान झालं हं. नेहमी आठवण करण्याजोगी एक छान आठवण तुमच्यामुळं आमच्याजवळ राहील आता.

**वसंत** : अरे, पण कथानक काय आहे त्याचं? तू वाचलं असशीलच.

**श्रीपाद** : अर्थातच.

**माधव** : कथानक आत्ताच कळल्यावर उत्सुकता कमी नाही का होणार?

**श्रीपाद** : खरं म्हणजे नाटक इतकं सुरेख आहे की कथानक आधी कळूनही ते पाहताना उत्सुकता वाटेलच.

**मीना** : हो?

**श्रीपाद** : हो. पण तुमच्या विचाराला चालना देण्यासाठी त्यातली एक कल्पना मात्र सांगतो. नाटकाच्या नावावरून दिसतंच की खरं आणि खोटं यांची चर्चा आहे नाटकात. कोर्टातला एक खटला घेतला आहे लेखकानं नाटकासाठी. खटला होता बलात्काराचा. खटल्यातले दोघेही सुशिक्षित होते बरं का! तरुणाचं म्हणणं असं की त्या तरुणीनंच त्याला उत्तेजन दिलं होतं आणि आता ती लोकांच्या भीतीनं खोटं बोलत होती. तर तरुणीचं म्हणणं हे धादांत खोटं आहे म्हणून.

**मीना** : मग पुढं काय झालं?

**श्रीपाद** : (हसत) ते नाटक पाहिल्यावर कळेल!

**माधव** : प्रश्न मोठ्या गुंतागुंतीचा आहे खरा. खरंच कसं काय ठरविणार खरं- खोटं इथं?

**श्रीपाद** : हाच प्रश्न नाटकात सतत पुढं मांडला आहे.

**भारती** : नाना, ही पाहा गंमत. झाला माझा बंगला. आता मी गाणं म्हणू?

**मीना** : इतका वेळ ही मैना गप्प होती. तिला आत्ता कंठ फुटला वाटतं?

**श्रीपाद** : भारती, जरा वेळानं म्हणायचं हं?

**वसंत** : कोर्टातलं एक वेळ राहो. पण खाजगी गोष्टींत विश्वासू मित्रांना खरं ते सांगायला काय हरकत आहे? सत्याची बूज अगदीच न राखून कसं चालेल? काय ती मुलगी तरी! खरंच, प्रथम स्वतःच उत्तेजन देऊन नंतर तिनं पाय मागं घेतला असेल का?

**माधव** : अशी उदाहरणं जगात आढळत नाहीत असं थोडंच आहे?

**वसंत** : नाही, पण खरं काय ते कळलंच पाहिजे असं मला वाटतं. खोट्या कल्पनेत राहून जगणं आणि इतरांना अशा रीतीनं फसवणं मला सुसंस्कृतपणाचं नाही वाटत. खरं काय ते कळवून घेऊनही माणसानं माणसासारखं जगलं पाहिजे. अशाच माणसाला मी खरा माणूस म्हणेन. काय श्रीपाद?

**श्रीपाद** : अगदी तुझ्यासारखंच माझंही मत आहे.

**वसंत** : कोणत्याही विचारी माणसाला असंच वाटेल.

**श्रीपाद** : साहजिकच आहे. आम्ही देखील त्याच काव्याला श्रेष्ठ मानतो की ज्यात वस्तुस्थितीची कल्पना यथातथ्य असूनही कवी कल्पनेचे खेळ दाखवतो. माधव, तुझं मत नाही सांगतलंस?

**माधव** : अगदी प्रश्न सार्वमताला टाकल्यासारखंच बोलतो आहेस?

**वसंत** : म्हणजे काय? तुला का मत नाही की विचार नाही? अं?

**मीना** : मी कॉफीचं पाणी ठेवून येते हं.

**वसंत** : अग ठेवशील मग. बैस जरा.

**भारती** : नाना, मला कंटाळा आला. चला ना घरी. इथं झोप येत नाही मला.

**श्रीपाद** : जाऊंच हं आता, थोड्या वेळानं. हं, मग काय, माधव?

**माधव** : माझं मत म्हणाल तर तुमच्यापेक्षा वेगळं नाही. पण त्यासाठी एक गोष्ट उजेडात आणावी लागेल.

**वसंत** : मग त्यात काय बिघडलं? उत्तमच!

**श्रीपाद** : हो ना.

**वसंत** : काय ती गोष्ट?

**माधव** : अरविंदा विहिरीत बुडून मेला नाही!

**सर्वजण** : काय?

**श्रीपाद** : अरविंदा अपघातानं मेला नाही. त्यानं आत्महत्या केली.

**सर्वजण** : आत्महत्या?

**माधव** : हो.

**मीना** : अग बाई!

**श्रीपाद** : ती का?

**माधव** : ते मला माहीत नाही. अनेकदा तो अगदी निराश असे. अशाच निराशेच्या भरात त्यानं गळफास लावून घेतला असला पाहिजे.

**वसंत** : त्यानं गळफास लावला? मग तो विहिरीत कसा पडला?

**माधव** : मी टाकलं त्याला विहिरीत.

**वसंत** : तू टाकलंस त्याला विहिरीत? का?

**माधव** : त्याला जगात माझ्याशिवाय नात्यातलं असं कुणी नव्हतं हे माहिती आहेच तुम्हांला. त्यानं आत्महत्या केली त्याआधी त्यानं मला पत्र पाठवलं. त्यात एवढंच म्हटलं होतं – 'माझ्या जीवनांत मला आशेचा कोणताही किरण दिसत नाही. म्हणून माझं जीवन मी संपवीत आहे. कोणताही गाजावाजा न करता माझी पुढची व्यवस्था कर.'

**श्रीपाद** : म्हणजे त्यानं आत्महत्या ठरवून केली वाटतं?

**माधव** : पत्र हातात पडताच मी धावतच गेलो. पण माझा हात फक्त उत्तरक्रियेपुरताच होता. मी त्याच्या प्रेतापुढं बसलो होतो. माझ्या मनात आलं, अरविंदानं विमा उतरला आहे. पण आत्महत्या करून त्यानं काय साधलं? त्या विमा कंपनीच्या अटीप्रमाणं आत्महत्या करणाऱ्या इसमाचा विमा मिळत नसे. मग मी त्याचा फास सोडला, कुणाला नकळत त्याला विहिरीत टाकलं, आणि तो बुडून मेल्याचं जाहीर केलं.

**वसंत** : पण याला जवळचं कुणी नव्हतं तर त्यानं विमा तरी का उतरला?

**माधव** : कुणास ठाऊक!

**वसंत** : आणि त्या विम्याचे पैसे मग तू घेतलेस?

**श्रीपाद** : ते उघड झालंच की!

**वसंत** : (रागाने) छान! त्या अरविंदाच्या पैशावर तू आज ही सगळी चैन करतो आहेस!

**माधव** : मग त्यात काय बिघडलं? मी काही त्याचा खून केला नाही, किंवा काही वाईटही चिंतिलं नाही. मी त्याचा कृतज्ञच आहे. उगीच भावनाविवश होऊन हातची संधी सोडण्यातच मला अविचार दिसला.

**वसंत** : (रागाने) तू विमा कंपनीला फसवलंस. तू आम्हांला फसवलंस. तू जगाला फसवलंस.

**श्रीपाद** : आणि म्हणे मी त्याचा कृतज्ञ आहे. म्हणे उगीच भावनाविवश होण्यात काय अर्थ आहे? अरे, ही गोष्ट लपवून ठेवून तू अरविंदावर केवढा घोर अन्याय केला आहेस याची तुला कल्पना तरी आहे

का? ही गोष्ट माहीत असती तर अरविंदाच्या कवितांचा अर्थ मला केव्हाच लागला असता! ही गोष्ट माहीत असती तर त्याचं काव्य जिवंत आहे, जातिवंत आहे, हे जगाला कळलं असतं आणि जग त्याचं काव्य डोक्यावर घेऊन नाचत राहिलं असतं!

**वसंत** : माधव, तू इतका नीच असशील असं वाटलं नव्हतं.

**माधव** : यात काय नीचपणा? त्याला निराशेचा 'मूड' –मी झटका म्हणतो त्याला – अनेकदा येत असे. तुम्हांला हे सांगायला पाहिजे का मी? अशाच झटक्यात त्यानं जिवाचा घात करून घेतला.

**श्रीपाद** : खोटं. धादांत खोटं. हा झटका नव्हता. ही ठरवून केलेली आत्महत्या होती. अरविंदासारखे कवी जिवाभावानं लिहीत असतात. ते सगळं खरंखरं लिहीत असतात. त्याची ती उत्कट भावगीतं वाचून ती खोटी आहेत असं कुणी म्हणेल तरी? आता तर माझी खात्रीच पटली. त्यानं प्रेमनिराशेमुळंच आत्महत्या केली.

**मीना** : खरंच का हो त्यांनी असं केलं असेल?

**श्रीपाद** : मग खोटं की काय? मला मुळीच शंका नाही.

(मीना एकदम हुंदका देते.)

**श्रीपाद** : वसंत, मला वाटतं, वहिनींनी आत जाऊन स्वस्थ पडावं. फार कोमल मनाच्या बुवा.

**वसंत** : हं! श्रीपाद, ही मीना त्याच्या काव्याची नायिका होती, नाही का?

**श्रीपाद** : वसंत, वसंत, शांतपणे विचार कर. यात मीनावहिनींचा काय दोष? आपण कुणाशी लग्न करावं हा त्यांचा प्रश्न होता. अरविंदाचं मन हळवं त्याला त्या काय करणार?

**भारती** : नाना, हे भांडताहेत का हो? मग यांची आई त्यांना मार देईल ना. अन् देवबाप्पापण शिक्षा करणार नाही का त्यांना?

**श्रीपाद** : भारती, मोठ्या माणसांच्यांत मुलांनी बोलू नये म्हणून सांगितलंय ना तुला?

**मीना** : (गदगद स्वरात) पण त्यांनी मला आत्महत्या न करण्याचं आश्वासन दिलं होतं.

**वसंत** : तुमचे संबंध इतक्या थराला गेले होते तर? तुला त्याच्याकडून असं आश्वासन घेणं का भाग पडावं? मीना, मला खरं काय ते सारं कळलं पाहिजे.

**मीना** : हो, आमचे संबंध बरेच होते. त्यांचं माझ्यावर प्रेम होतं हे मला

माहीत होतं. पण मला त्यांच्याशी लग्न करायचं नव्हतं. इतक्या भावनाप्रधान माणसाशी संसार सुखाचा होईल असं मला वाटलं नाही. त्यांच्याबरोबर जगणं मला शक्य नव्हतं पण मी त्यांच्यावर प्रेम केल्यावाचून राहू शकले नाही.

**वसंत** : म्हणजे तूच त्याला उत्तेजन दिलंस आणि मागून त्याचा विश्वासघात केलास.

**मीना** : विश्वासघात कसा? आत्महत्या न करण्याचं आश्वासन घेतलं होतं मी त्यांच्याकडून.

**श्रीपाद** : आश्वासन घेतलंत आणि तुम्ही मोकळ्या झालात! पण तुम्हाला माहीत नाही की रोमँटिक कवींचा तो एक स्वभावविशेषच आहे. ज्या व्यक्तीवर आपण प्रेम करतो तिला कोणतीही वेदना झाली तर ती त्यांना असह्य होते. अरविंदा खराखुरा रोमँटिक कवी होता. आपल्या प्रेयसीला त्रास होऊ नये म्हणून त्यानं तसं आश्वासन दिलं.

**वसंत** : किती अप्पलपोटी आहेस तू मीना.

**मीना** : त्यांच्या मृत्यूला मी कारण झाले नाही असं वाटून किती बरं वाटत होतं आजवर! (रडते.)

**वसंत** : ढोंगी मीना, मला सांग. त्यानं विमा का उतरला? तुमचं लग्नाचं ठरलं होतं की नाही?

**मीना** : नाही. नाही. त्यांनी लग्नाचं विचारलं तेव्हा मी म्हटलं, 'मी एक गरिबीत जगू शकेन, पण आपलं काही बरंवाईट झालं तर आपल्यामागे मुलांचं काय?' तेव्हा त्यांनी लगोलग विमा उतरला आणि ते मला भेटायला आले.

**वसंत** : त्या हळव्या जीवाला केवढी ओढ लावून ठेवलीस तू तुझ्या बोलण्यानं. तू त्याची वंचना केलीस.

**भारती** : नाना, चला ना हो. मला झोप येत नाही इथं. माझं डोकं दुखतंय.

**श्रीपाद** : भारती, तुला शहाणी शहाणी म्हटलं म्हणून अशी कटकट करतेस होय? गप बैस पाहू. जाऊ जरा वेळानं. माधव, फार फार आभारी आहे मी आपला. शेवटी का होईना, तुम्ही खरं बोललात. बरं झालं. आता माझ्या अरविंदावरच्या प्रबंधाला पूर्णता येईल.

**माधव** : काय? हे सारं छापलं जाणार?

**श्रीपाद** : अर्थात.

**माधव** : श्रीपाद!

**वसंत** : श्रीपाद, आत्महत्या करणाराला अपघातानं मेला म्हणून जाहीर करणारा हा राक्षस आहे. तू काही लिहायला जाशील तर तुझा खून करून तूही अपघातानं मेलास म्हणून जाहीर करील तो!... अरेरे, हे काय झालं! ज्याला जिवलग मित्र मानलं तो इतका स्वार्थी निघाला आणि जिला पवित्र पत्नी म्हटलं ती अशी सुखासाठी प्रीतीची वंचना करणारी निघाली!

**मीना** : मला फसवी म्हणता, पण तुम्ही तरी काय केलंत? लग्नाच्या पत्रिका छापून आणि वाटून झाल्यावर वडिलांना 'हुंड्याची रक्कम वाढवा' म्हणून निरोप धाडलात आणि सप्तपदीशिवाय लग्न होत नाही असा कायद्याचा आधार सांगून दहा हजार रुपये जास्त उकळलेत!

**वसंत** : मीना, तोंड आवर–

**मीना** : का आवरू? तुम्हाला स्वतःच्या बेगड्या अब्रूची काळजी वाटते म्हणून माधवना राक्षस म्हणून त्यांची भीती दाखवता आणि श्रीपादांच्या लेखनाला बाधा आणता–

**श्रीपाद** : अरेरे, हीच का सत्याची चाड? अरे वसंत, तूच ना सत्य पाहिजे म्हणून हट्ट धरलास?

**वसंत** : माझी स्मृती चांगली शाबूत आहे, श्रीपाद. तू आठवण करून देण्याची जरूर नाही. अरे, नाटक न वाचता मागे तू एका नाटकावर कसे कोरडे ओढलेस आणि स्वतःचं हसं करून घेतलंस ते विसरलो नाही मी! तुला जाहीर माफी मागायला लावली होती की त्या नाटककारानं. लाचार तो लाचार पण आव केवढा! तू कबूल कर, मला वचन दे. अरविंदासारखं खोटं नाही, खरं की यातलं एकही अक्षर छापलं जाणार नाही.

**मीना** : श्रीपाद, तुमच्या या भारतीची शपथ आहे तुम्हाला. वचन द्या.

**भारती** : चला की हो नानाऽऽ

**श्रीपाद** : भारतीऽ (भारती मुसमुसते). मी वचन देतो, मी याची कसलीही मीमांसा करणार नाही, पण एका अटीवर. माझ्या या मीमांसेनं माझं नाव झालं असतं. ते तसं होऊ नये अशी तुम्हा सगळ्यांची इच्छा आहे. ठीक. पण यामुळे माझी जी कीर्ती होणार नाही तिची सव्याज भर व्हायला पाहिजे.

**माधव** : कशानं?

**श्रीपाद** : अर्थात पैशानं!

**वसंत** : काय माणूस आहेस रे तू तरी!

**मीना** : श्रीपाद, तुमच्यासारख्या विद्वानाकडून अशी अपेक्षा नव्हती आम्हांला.

**श्रीपाद** : हे तुम्ही सांगता मला? मीनाबाई, शोभतं हे तुमच्या तोंडी? मलासुद्धा तुम्हा कोणांकडून तुम्ही केलेल्या प्रकारांची अपेक्षा नव्हती. अगदी स्वप्नांतसुद्धा!

**माधव** : (ओरडून) श्रीपाद!

**श्रीपाद** : माधव, आरडाओरडीचा काहीही उपयोग होणार नाही. तुझी अब्रूच काय, तुझं जीवनदेखील माझ्या हातात आहे. तू त्या दहा हजारांची दसपट करणार. त्यातला माझा वाटा मला पाहिजे. वसंतराव, तुम्हाला दोघांच्या अब्रूची किंमत द्यायची आहे. तुमच्या आणि तुमच्या बायकोच्या. मी आशा करतो, तुम्ही सर्वजण आपापल्या अब्रूची किंमत भरपूर कराल! मी चाललो, पण माझ्या पावलांवर पावलं टाकीत तुमचे सगळ्यांचे पैसे चालत येतील याच अपेक्षेनं. चल ग भारती.

**भारती** : (जाता जाता) अच्छा. टाऽटा... टाऽटा... नाना, हे कुणीच टाटा का म्हणत नाहीत हो?

(श्रीपाद आणि भारती जातात.)

**वसंत** : माधव, प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाणारा तू. तू कशाला थांबला आहेस इथं?

**माधव** : तुमची शोभा बघायला. अच्छा. येतो. (जातो.)

**वसंत** : कमाल आहे तुझी मीना! तुझं तोंड एक क्षणभरसुद्धा पाहण्याची माझी इच्छा नाही. तू भोळ्या अरविंदाला जीवनातून उठवलंस आणि परक्या माणसांसमोर बिनदिक्कत माझी –आपल्या पतीची– नाचक्की केलीस. मी चाललो. माझ्यामागे येऊ नकोस. काय वाटेल ते कर. कुठेही जा. प्रेमासाठी एकाच्या गळ्यात पडलीस, सुखासाठी दुसऱ्याच्या घरात शिरलीस, आता जिवासाठी कोणाचाही आसरा घे. जा.

**मीना** : वसंत, वसंत...

(वसंत मीनाला थोबाडीत मारतो. जातो. ती पडते. रडते. मग उठून सगळीकडे चमत्कारिक नजरेने पहाते, आणि विचित्रपणे हसत निघून जाते... काही क्षण

काळोख होतो. पुनः दिवे लागतात त्यावेळी वसंत आणि माधव यांचे हसणे ऐकू येत असतानाच घड्याळात नऊ वाजल्याचे ठोके पडतात.)

**माधव** : वसंता, तूही पण कमाल केलीस हं!

**वसंत** : अरे माधव, मी कामं केलेली आहेत कॉलेजच्या नाटकांतून.

**मीना** : ही काय थट्टेची रीत झाली? हुं!

**वसंत** : अग थट्टेला कसली रीत, मीना? पुष्कळदा खोट्या गोष्टींनीच अशी मजा आणायची असते. मी कॉलेजात होतो तेव्हा तासाला कंटाळा आला की उगीचच शंका उकरून काढून तास घालवीत असे!

**माधव** : वहिनी, पण फसलात की नाही?

**मीना** : आम्हां बायकांची मनं खरंच तुमच्यापेक्षा जास्त हळवी. कोणतीही स्त्री फसली असती.

**माधव** : ते काही नाही. आम्हाला पेनल्टी पाहिजे, पाहिजे, पाहिजेऽ

**श्रीपाद** : (भारतीला घेऊन येत) अरे, अरे, अरे, काय चाललंय काय?

**वसंत** : या या टीकाशास्त्री श्रीपाद.

**श्रीपाद** : भारती...

**भारती** : नमस्ते...

**मीना** : (लहान मुलीशी बोलण्याच्या स्वरात) ओहो! भारतीपण का? छान! नानांशिवाय करमत नाही वाटतं?

**श्रीपाद** : (हसत) मलाच तिच्याशिवाय करमत नाही. एवढीशी चिमणीसारखी आहे पण... माझीच मुलगी म्हणून म्हणतो असं नाही, तुम्ही पाहालच – फारच समजूतदार आहे. रडणं नाही की कधी कुणाशी भांडणं नाही.

**वसंत** : हो का ग भारती?

**मीना** : अय्या, कित्ती गोड लाजते हो!

**श्रीपाद** : आतादेखील ती आपली पत्त्यांचे बंगले करीत बसेल आणि कंटाळली की जाईल झोपी मुकाट्यानं.

**माधव** : काय ग, तुझे नाना तुला हाक कशी मारतात? भारे, भारती की नुसतंच रती?

(सर्वजण हसतात.)

**मीना** : काय भारती, आम्हांला छानसं गाणं म्हणून दाखवणार नं? अं?

**भारती** : मी नाही.

**श्रीपाद** : आत्ता लाजली आहे ती. म्हणेल मग जरा वेळानं. हो ना रे राजा?

हो.

**माधव** : वहिनी, आपला मूळ मुद्दा बाजूला राहतोय हं.

**श्रीपाद** : अरे हो खरंच, काय पाहिजे होतं कोणाला?

**माधव** : अरे श्रीपाद, तूच पाहिजे होतास. पण हे बघ, उगीच कसली मीमांसा करीत बसणार नसशील तरच. आता आम्ही – म्हणजे वसंतानं आणि मी– एक नाटक केलं. पैशावरून भांडणाचं! आणि वहिनींना हातोहात फसवलं बघ. त्यांच्या डोळ्यांतनं पाणी आलं तेव्हा थांबवलं!

**श्रीपाद** : छान!

**माधव** : तर आता प्रश्न असा – वहिनींनी पेनल्टी द्यायला पाहिजे की नाही? थोडक्यात सांग. मीमांसा नको.

**श्रीपाद** : वाः! म्हणजेच काय? पाहिजेच! (सर्व पुरुष हसतात.) वहिनी, मी सांगतो तुम्हाला पेनल्टी. तुमचा सतारवादनाचा कार्यक्रम आहे ना रेडिओवर? 'लिसनर' मध्ये वाचलं बरं का आम्ही. मग तुम्ही आम्हाला आज खूप वेळ सतार ऐकवायची!

**माधव** : सुरेख, सुरेख. श्रीपाद, तुझ्या त्या टीका आणि मीमांसा मी आदरानं दुरूनच बघत असलो तरी तुझी ही टीका मात्र आपल्याला एकदम पसंत पडली बुवा!

**मीना** : बरं. येते मी सतार घेऊन. (जाते.)

**श्रीपाद** : कित्येक वेळा असं वाटतं की इंग्रजी चालीरीती पुष्कळ चांगल्या. आता हेच पाहा ना. वसंत, आपण जर इंग्लंडमध्ये असतो ना, तर प्रत्येकवेळी तुझ्या घरी येताक्षणीच तुझं अभिनंदन केलं असतं मी–

**माधव** : अशी बायको मिळवल्याबद्दल ना?

**श्रीपाद** : अर्थात! अरे कॉलेज गाजत होतं तिच्यामुळं! कितीतरी गद्यप्रकृती विद्यार्थ्यांनाही तिच्यावर पद्य करायची स्फूर्ती होत असे. पण अरविंदाच्या कवितेची सर कोणालाच आली नाही.

**वसंत** : काय अरविंदानं तिच्यावर कविता...?

**श्रीपाद** : वसंता, सांभाळून हं! कविता करायला काही बंदी नाही. इतरांनी केल्या. अरविंदानंही केली. मला म्हणून त्यानं कवितेची नायिका कोण ते सांगितलं. पण यापेक्षा जास्त तो कधीच काही म्हणाला नाही. आणि आणखी काही असेलसं मलाही वाटत नाही.

(मीना येते.)

**माधव** : वाः! वहिनी, तुमच्या हातात सतार म्हणजे – मी पडलो बिझिनेसमन, मला काय वर्णन करता येणार एखाद्या कवीसारखं – पण अगदी शोभून दिसते हं!

**श्रीपाद** : सतारवादनानं मला नेहमी प्रमत्त मयूराच्या नृत्याचीच आठवण होते. सरस्वतीचं वाहन मोर करण्यात आणि तिच्या हातांत सतार देण्यात केवढी कल्पकता दाखवली आहे आपल्या पूर्वजांनी!

**वसंत** : काय ग आज तुझा आवडता शंकरा आधी वाजवणार की माझा मालकंस?

**मीना** : आधी तारा तर लावून घेते.

**सर्वजण** : हो, हो, ते खरंच.

(मीना सतारीच्या तारा जुळवून लावते आणि मालकंस राग वाजविण्यास सुरुवात करते. थोड्याच वेळात वादनास रंग भरतो. वसंत, माधव, श्रीपाद, 'सुरेख', 'सुंदर', 'वाहवा' म्हणत राहतात.)

# मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान

**अ काव्य**

१. नव्या युगाच्या कविता

२. 'नवरा नको ग बाई' आणि इतर पथनाट्ये

**ष्ट कथा**

३. 'नको हे पुरुषी मन' आणि इतर लघुकथा

४. शुभ मंगल! विज्ञान!! (विज्ञान कथा)

५. 'अवतार' आणि इतर कथा

**पै नाटक**

६. मस्तानीचा बाजीराव

७. सत्तेचा विजय असो!

८. प्रीती मिळेल का हो?

९. गजराज आणि वनराज

१०. आग लागो या सगळ्याला

११. चल ये, चल ये, चल ये, बयेऽ

१२. 'निम्मी माझी, निम्मी तुझी' आणि इतर एकांकिका

**लू पटकथा**

१३. स्वातंत्र्यवीर

**सा कादंबरी**

१४. त्सुनामीची सुवर्णसंधी

१५ किलर इन्स्टिंक्ट

१६. अंतिम सत्य

**हि विज्ञान**

१७. विज्ञानाचा कल्पतरू

**त्यि समीक्षा**

१८. साहित्यातील प्रीती आणि भक्ती

१९. महाराष्ट्रातील वैज्ञानिक क्रांती

२०. केशवसुतःवैदिक संस्कृतीचा आधुनिक उद्गाता

२१. केशवसुत गातचि बसले!

२२. वैज्ञानिक समीक्षा

**क संकीर्ण**

२३. हिंदू समाजाचा छेदाभ्यास

२४. इंग्रजीत नापास? अशक्य!!!

२५. To Be, or Not To Be

# प्रतिभेचा स्तिमित करणारा साक्षात्कार

## मुरलीधर जावडेकर यांची कला

**कथाकथन** : १५ ऑगस्ट १९९९ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त अमेरिकेत कथासंग्रहप्रकाशन आणि कथाकथन केले. महाराष्ट्रात अनेक प्रयोग केले. श्रोते चकित, आनंदित, प्रभावित होतात. कितीही वर्षे जावोत पुनः भेटले की कथांची आठवण काढतात. आजचे आघाडीचे कथाकार.

**नाट्यवाचन** : 'मस्तानीचा बाजीराव' या स्वतःच्या नाटकाचे वाचन थोरल्या बाजीरावांच्या तीनशेव्या जन्मदिनी पुण्यात केले. त्यानंतर दूरदर्शन (सह्याद्री) ने मुलाखत घेतली आणि नाट्यवाचनाचे वर्णन 'मंत्रमुग्ध करणारे' असे करून ती प्रसृत केली. डॉ. वि. भा. देशपांडे आदींना आवडलेली संहिता आणि नाट्यवाचन.

**काव्यप्रस्तुती** : साहित्य संमेलनाध्यक्ष कविवर्य श्री. नारायण सुर्वे, गंगाधर महांबरे, संगीता जोशी इत्यादींना आवडलेल्या कविता. काव्यसंग्रहप्रकाशन आणि 'काव्याचे नाट्यपूर्ण बहारदार सादरीकरण' केले.

**एकपात्री नाट्यप्रयोग** : 'स्वातंत्र्यवीर' (वि. दा. सावरकर) हा (सावरकरांच्या ६ ध्वनिमुद्रित पदांसह) प्रयोग अत्यंत प्रभावी होतो. स्वर्गीय सुधीर फडके, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, स्वा. सावरकर संमेलनाध्यक्ष वा. ना. उत्पात आदींनी दाद दिली. प्रेक्षकांना सावरकर भेटल्याचा परमानंद होतो. पुण्याच्या 'सांस्कृतिक वार्तापत्र' संस्थेने याबद्दल सत्कार केला.

**व्याख्यान, मुलाखत इत्यादी** : धर्म, विज्ञान, संस्कृती, वाङ्मय इत्यादी विषयांवर महाराष्ट्रातच नव्हे तर अन्य प्रांतांतही अनेक व्याख्याने झाली. दूरदर्शन आणि आकाशवाणी यांनी अनेक मुलाखती घेऊन पुनः पुनः प्रसारित केल्या.


**डॉ. मुरलीधर जावडेकर**

**जन्म** : २० मे, १९३६, शिक्षण : एम.ए. (पुणे), पीएच.डी. (मुंबई)
**व्यवसाय** : मराठी, इंग्रजी प्राध्यापक, प्राचार्य.
म्हाडा उच्च उत्पन्न गट वसाहत, इमारत क्र. १,
गाळा क्र. ९, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८
(महाराष्ट्र राज्य–भारत)
**दूरध्वनी** : ०२०–२७४२१६८३
**मोबाईल** : ९८९०१६९१५६



**डॉ. मुरलीधर जावडेकर**

'थोडी तो गोडी' हे जीवनाच्या बाबतीत खरेच आहे, पण कलेत तर ते फारच खरे आहे. म्हणूनच एकांकिका! किमान अवकाशात कमाल प्रभाव दाखवण्याचे वैभव ही कला मिरवीत असते. क्षणात घडणाऱ्या गोष्टीच चटका लावून जातात - कित्येकदा कायमचा! वाङ्मयात कादंबरीसारख्या दीर्घप्रदीर्घ प्रकाराचं महत्त्व जरूर असते. पण अमर, अक्षर झालेल्या लघुकथांची संख्याही आता गणनेच्या पलीकडे गेली आहे, असे म्हणण्यास हरकत नाही - जगात! म्हणूनच कित्येक लघुकथा एकांकिकेच्याच अंगाने जातात! मग लघुकथा आणि एकांकिका या वाङ्मयांत साम्य काय आणि भेद काय?
या प्रश्नाच्या चर्चेला हा संग्रह चांगले खाद्य पुरवील!!